## मंत्रालयात प्रवेश : केवळ ऑनलाइनच नोंदणी

**मुंबई, दि. ११ वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयात नागरिक, राजकीय नेतेमंडळी, आमदार, खासदार, पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रमुख भेटी देत असतात. स्थानिक आणि जिल्हा पातळीवर आपली कामे रखडल्यानंतर संबंधित व्यक्ती वा संस्था मंत्रालयाचं दार ठोठावत असते. मात्र, आता मंत्रालयाचं दार सहजपणे ठोठावता येणार नाही. मंत्रालयीन प्रवेशासाठी सरकारने आता ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरू केली असून डिजी प्रवेश पास असल्याशिवाय तुम्हाला मंत्रालयात एंट्री मिळणार नाही. मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना आता केवळ डिजिटल प्रवेश पत्राद्वारेच प्रवेश देण्यात येईल. डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येणार आहे. येत्या १५ ऑगस्टपासून ही नवी कार्यप्रणाली लागू केली जाणार आहे.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:७३ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


**अग्रलेख**

## खरीखरी

### आयोगाचे खाली डोके वर पाय

आपल्या देशातील निवडणूक आयोगाला अर्धांग वायू झाला आहे की काय, असे वाटायला लागलेले आहे. निवडणूक आयोग सरळ सरळ विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे का देत नाही. हा अजून एक जटिल प्रश्न बनलेला आहे कारण निवडणूक आयोगाने भेटीची वेळ दिली होती. त्या भेटीसाठी ३०० खासदार चालले होते मग त्या ३०० पैकी निवडणूक आयोगाने आदेश दिल्याप्रमाणे केवळ ३० प्रतिनिधी भेटायला जाणार होते. वरवर पाहिले तर निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नांना सरकारी उत्तर कशाला, असे आता सारी जनता म्हणत आहे कारण सरकारच्या प्रवक्त्यांना या प्रश्नामध्ये नाक खूपसण्याची काही गरज नव्हती पण आयोग एकाही प्रश्नाचे उत्तर द्यायला तयार नाही. विशेष म्हणजे हे सर्व जनता पहात आहे त्यामुळेच हे भारतातील निवडणूक आयोगाच्या विश्वसनीयतेवर आता जनतेतून प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. आपल्या देशातील निवडणूक आयोग आणि त्यांचा इतिहास अगदी उज्वल आहे विशेषतः आपल्यावर दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या इंग्लंड या देशांमध्ये निवडणूक आयोग नावाचा प्रकार अस्तित्वातच नव्हता. ही कपोलकल्पित कथा नाही हे सत्य आहे. १९९६ सालामध्ये त्याच इंग्लंड देशांमध्ये निवडणूक आयोग स्थापन करण्यासाठी तेथील सरकारने निर्णय घेतला. त्यानंतर अशा प्रकारच्या निवडणूक आयोगाचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडचे एक मोठे शिष्टमंडळ भारतात दाखल झाले होते. कारण आपल्याच लोकशाही मानणाऱ्या देशाचा निवडणूक आयोग शिस्तबद्ध आणि निष्पक्ष आहे, जनतेच्या विश्वासाला पात्र आहे अशी त्यावेळी जगभर खात्री झाली होती. विनाकारण खुस्पटे शोधून काढणाऱ्या इंग्रजांनीच स्वतः भट देऊन त्याबाबतची ग्वाहीच दिली होती. त्यामुळे आपल्याच निवडणूक आयोगाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जगभरातील निवडणुकांचा पर्यवेक्षीय अभ्यास करण्यासाठी बरेच लोक भारतात येत होते. पण आता हा भूतकाळ झालेला आहे या भूतकाळातील अभूतपूर्व गोष्टी आता आपण दररोज बघत आहोत. सध्या तरी आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी असा प्रकार सुरू झाला आहे की काय, कारण हे आता जवळपास बऱ्याच बाबतीत दिसून येत आहे. पूर्वीही निवडणूक आयोग शंभर टक्के पक्षपात रहित होता असे नाही. पण तो कणाहीन होता असेही कधी वाटले नाही. टी एन शेषन नावाचे वादळ जेव्हा निवडणूक आयोगाच्या मुख्य पदावर आरुढ झाले आणि त्यांनी अनेक निर्णयांचा असा काही धडाका लावला की त्यामध्ये केवळ विरोधी पक्षच नाही तर सत्तारूढ पक्षातील अनेक जण घायाळ झाले होते हा इतिहास आहे. त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी निवडणूक आयुक्त शेषन यांच्या शेषनागी फण्याला चिरडण्याचा प्रयत्न अजिबात केला नव्हता हे या ठिकाणी नम्रपणे नमूद करण्याची गरज आहे. त्यानंतर आलेले आयुक्त शेषन नसले तरी, निदान त्यांच्यामध्ये शेषन यांचा उरलेला शेष अंश तरी नक्कीच जागृत होता. जगभरातून आपल्या निवडणुकांचे अवलोकन करण्यासाठी हल्ली कोणीही येत नाही. याचे कारण कोणतेही असले तरी त्याची चर्चा करण्याची गरज आम्हाला वाटत नाही. सत्तेवर असणाऱ्यांनी कोणकोणती पथ्य पाळावी याचा धडा शिकवण्यात किंवा शिकवण्यासाठी आम्ही पात्र नाही. मात्र आपला महाबलशाली निवडणूक आयोग कोणकोणते भयानक प्रयोग करीत आहेत त्याचे खुलासे होत आहेत. विशेष म्हणजे अत्यंत दुर्दैवाची गोष्ट अशी की सत्ताधारी निवडणूक आयोगाच्या बाजूने उभे आहेत. सरकारने खरे तर या प्रकाराला वेसण घातली पाहिजे. कारण हे कोणत्या क्षणी उलटणारे शस्त्र आहे. सध्याच्या सरकार मधील सामर्थ्यशाली बडे लोक नक्कीच याचा विचार करत असतील पण त्यांच्याच पक्षातील बोलघेवडे आणि नवीन आलेले वाचाळवीर आणि चोंबडे प्रवक्ते जणूकाही सरकारची आणि आयोगाची बदनामी कशी होइल यावरच भाष्य करण्यासाठी जन्मलेले दिसतात, निदान आपल्या आयोगाने तरी खाली डोके वर पाय असे वागू नये, इतकीच आमची आग्रहाची विनंती आहे...!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# कुंडेश्वर दर्शनाला जाताना काळाचा घाला

## ९ ठार, २० जखमी



**खेड, दि. ११ प्रतिनिधी**

श्रावण सोमवारनिमित्त राज्यभरातील मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण असताना खेड तालुक्यातून मन विषण्ण करणारी बातमी आली आहे. खेड तालुक्यातील पाईट येथील कुंडेश्वर देवदर्शनासाठी पिकअप गाडीतून निघालेल्या माहिलांवर काळाने घाला घातला असून या अपघातात ९ महिलांचा मृत्यु झाला असून, २०-२५ महिला गंभीर जखमी झाल्या आहत. घाटातील नागमोड्या वळणावरून जाताना पिकअप वाहन पाच सहा पलटी खाऊन १०० ते १५० फूट खोल दरीत कोसळले. जखमींपैकी अनेक महिलांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सोमवारी दुपारच्या सुमारासचा हा अपघात घडला.

श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारनिमित्ताने अनेक शिव मंदिरे गर्दीने फुलली आहेत. याच दरम्यान, भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. खेड तालुक्यातील कुंडेश्वर दर्शनाला जाताना पिकअप गाडीचा भीषण अपघात होऊन सात महिलांना आपल्या जीवाला मुकावे लागले आहे. पिकअपमधील जवळपास ३० हून अधिक महिला जखमी असून त्यापैकी १९ महिलांची प्रकृती गंभीर असून रुग्णालयात हलवण्यात आले आहे

पाईट परिसरातील श्रीक्षेत्र कुंडेश्वर येथे पिकअप गाडी हीकुंडेश्वर डोंगराच्या पहिल्या वळणावर घाट चढत असताना पुढे न जाता पाठीमागे घसरल्याने ती दीडशे फूट खोल दरीत कोसळली. अपघात स्थळावरील दृष्य खूपच विदारक होते. सर्वत्र रक्ताचा सडा पडला होता.

श्रावणी सोमवार निमित्त खेड तालुक्यातील भाविक मोठ्या प्रमाणात कुंडेश्वर येथे देवदर्शनासाठी येतात. दुपारच्या सुमारास महिलांनी खच्चून भरलेले पिकअप वाहन रस्त्यावर तब्बल पाच- सहा पलटी खाउन दरीत कोसळले. रस्त्यावर रहदारी असल्याने तातडीने स्थानिक लोकांनी खाजगी व १० हून अधिक ॲब्युलेन्सद्वारे अपघातग्रस्त महिलांना रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच ७ महिलांचा मृत्यू झाला व २०-२५ हून अधिक गंभीर जखमी आहेत. अपघात प्रचंड गंभीर असून. मृतांची संख्या वाढू शकते, असे स्थानिक नागरिकांना सांगितले आहे. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीसाठी प्रयत्न केले.

# फडणवीस 'चीफ मिनिस्टर' नव्हे, तर 'थीफ मिनिस्टर' - उद्धव ठाकरे




**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

आज संपूर्ण महाराष्ट्र जागा झाला आहे. शिवसेना रस्त्यावर उतरून सत्ताधाऱ्यांविरोधात संघर्ष करत आहे. सत्ताधारी बिनडोक आहेत, त्यांच्याकडे डोक नाही पण खोके आहेत, देवेंद्र फडणवीस चीफ मिनिस्टर नाहीत, तर थीफ मिनिस्टर आहेत, असा हल्लाबोल शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज चढवला.

दिल्लीमध्ये इंडिया आघाडीतील सर्व पक्षीयांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज पार्क, दादर, मुंबई येथे 'महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन' करण्यात आले. यावेळी ठाकरे बोलत होते. यावेळी युवासेनाप्रमुख शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे, शिवसेना नेते सुभाष देसाई, शिवसेना नेते दिवाकर रावते, शिवसेना नेते सचिव विनायक राऊत, शिवसेना नेते आमदार ॲड. अनिल परब, शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव, शिवसेना नेते आमदार सुनिल प्रभू तसेच शिवसेना उपनेते, सचिव, आमदार, विभागप्रमुख आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ठाकरे म्हणाले की, ही जुलूमशाही आता थांबवली पाहिजे, म्हणून जनता रस्त्यावर उतरली आहे. शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र तुम्ही कोणत्या रांगेत ठेवला आहे? आम्हाला तुमची लाज वाटते," असा संतप्त सवालही त्यांनी यावेळी केला.

मंत्रीपदावर आरोप झाले तर तात्काळ राजीनामा देण्याची परंपरा असल्याचे सांगून, मी देखील माझ्या काळात मंत्र्यांचे राजीनामे घेतले. वनमंत्र्याला तर वनवासात पाठवले, अशी आठवण करून देत अंबादास दानवे आणि अनिल परब यांनी पुरावे दिले. तर मंत्र्यांवर कारवाई होत नाही. एका व्यक्तीला आवडीचे खाते मिळाले, ते म्हणजे 'रमी मंत्री'. यांच्या चौकशीची गरज नाही, थेट हकालपट्टी केली पाहिजे होती. माजी उपराष्ट्रपती धनखड यांच्या अचानक गायब होण्याचा मुद्दा उपस्थित करून, "ते सरकारविरोधात होते म्हणून त्यांना काढले, असे मला कळले. जसे चीनमध्ये विरोधक गायब होतात, तसेच इथे घडत आहे का? धनखड कुठे आहेत, त्यांचे तुम्ही ऑपरेशन केले आहे का?, असा सवाल ठाकरे यांनी केला.

आपल्या खांद्यावर मोठी जबाबदारी आहे, असे सांगत 2014 साली नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या 'चाय पे चर्चा'ची आठवण करून देत, "तशीच भ्रष्टाचारावर चर्चा करा," अशी मागणी करण्यात आली. देवेंद्र फडणवीस यांच्यावर भ्रष्टाचाराच्या बाबतीत लोकांना गप्प का बसवले जात आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून, त्यांनी दिलेले कारण तुम्हाला पटते का?. तुम्ही मतांची चोरी केली आणि आज विरोधक दिल्लीमध्ये आंदोलन करत आहेत. सत्ता येते-जाते, पण इतिहासात काय नोंद होते, हे महत्वाचे. भ्रष्टाचाराची माहिती जनतेपर्यंत पोहोचली पाहिजे, असे सांगून या शिवाजी पार्कातून आज भ्रष्टाचाराला जाळून टाकणारी मशाल पेटली आहे, असा इशारा ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

# दिल्लीत इंडिया आघाडीला सरकारने अडवले



**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात लोकसभा ते निवडणूक आयोग असा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात प्रियांका गांधी, सुप्रिया सुळे, शरद पवार, अखिलेश यादव, संजय राऊत यांच्यासह इंडिया आघाडीच्या ३०० खासदार सहभागी झाले होते. मत चोरीच्या आरोपांवर उत्तर द्या अशा मागणी करत हा मोर्चा काढण्यात आला. दरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांना रोखण्यासाठी बॅरिकेडिंग करण्यात आले होते.

राहुल गांधी आणि प्रियांका गांधी या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्यामुळे अखिलेश यादव यांनी विचारले की आम्हाला पोलीस का रोखत आहेत. आम्ही शांततेत मोर्चा काढला आहे. लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सभागृहातले ३०० खासदार या मोर्चात सहभागी झाले.

समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव म्हणाले निवडणूक आयोगाच्या कारभारावर अनेकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर आमच्या तक्रारी आहेत त्या तक्रारींचं निवारण निवडणूक आयोगाने केलं पाहिजे. पण आम्हाला इथे अडवलं जातं आहे. उत्तर प्रदेशातही मतांची लूट केली जाते आहे. आम्हाला संसदेत आमचं म्हणणं मांडायचं आहे पण विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो आहे.

राहुल गांधी यांनी मागच्या आठवड्यात एक पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. मतांची चोरी कशा मार्गाने केली गेली, त्याचा प्रयोग देशभरात कसा झाला? हे त्यांनी विविध याद्या दाखवत आणि त्यातले घोळ दाखवत सांगितलं. ज्यानंतर कर्नाटक निवडणूक आयोगाने त्यांना नोटीसही बजावली. मात्र या सगळ्याचा विचार न करता राहुल गांधी यांनी आज त्यांच्या नेतृत्वात विरोधी खासदारांना बरोबर घेत व्होट चोरीच्या विरोधात मोर्चा काढला. या ठिकाणी काही प्रमाणात संघर्ष निर्माण झाला. काही खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. संसद भवन मार्ग पोलीस ठाण्यात या खासदारांना नेण्यात आलं होतं. या मोर्चात शरद पवार, सुप्रिया सुळे, संजय राऊत, काँग्रेसमधले दिग्गज नेते, इंडिया आघाडीचे खासदार हे सगळे उपस्थित होते.

# सुधारित आयकर विधेयक, 2025 लोकसभेत सादर

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी लोकसभेत सुधारित आयकर विधेयक, २०२५ सादर केले. खासदार वैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समितीने सुचवलेल्या जवळपास सर्व शिफारशींचा त्यात समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर आज सुधारित विधेयक सादर करण्यात आले.

सहा दशके जुना आयकर कायदा, १९६१ ची जागा घेणारे आयकर विधेयक १३ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आले होते. गेल्या शुक्रवारी हे विधेयक अधिकृतपणे लोकसभेतून मागे घेण्यात आले होते. वैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समितीने १३ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर केलेल्या आयकर विधेयकात अनेक बदल सुचवले होते. लोकसभेत हे विधेयक सादर झाल्यानंतर लगेचच, हे विधेयक सुधारणांसाठी निवड समितीकडे पाठवण्यात आले. ३१ सदस्यांच्या निवड समितीने विधेयकावर काही सूचना केल्या.

**काय आहे नवीन बदल?**

- समितीने नवीन आयकर कायद्यात धार्मिक आणि धर्मादाय ट्रस्टना दिलेल्या अनामिक देणग्यांवर कर सूट सुरू ठेवण्यास अनुकूलता दर्शविली आहे. तसेच आयटीआर दाखल करण्याच्या अंतिम तारखेनंतरही करदात्यांना कोणताही दंडात्मक शुल्क न भरता टीडीएस परतावा मिळविण्याची परवानगी द्यावी असे सुचवले आहे.
- आयकर विधेयक, २०२५ हे भारताच्या करप्रणालीला अद्ययावत आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहे. संसदीय निवड समितीच्या २८५ शिफारशींपैकी बहुतांश शिफारशींचा यात समावेश करण्यात आला आहे.
- आयकर (क्रमांक २) विधेयक, २०२५ लोकसभेत सादर करताना, सीतारामन यांनी सांगितले केले की या कायद्याचा उद्देश आयकर नियम सुलभ आणि अद्ययावत करणे आहे. निवड समितीच्या जवळपास सर्व शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहेत.

# धनखड 20 दिवसांपासून बेपत्ता

## ठाकरे गटाचा मोदी सरकारवर संशय

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड कुठे आहेत? असा प्रश्न शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. राऊत म्हणाले, "देशातील इतक्या मोठ्या पदावरील व्यक्ती गेल्या २० दिवसांपासून बेपत्ता आहे. त्यांचं काय झालं? त्यांची प्रकृती कशी आहे? याबाबत देशातील जनतेच्या मनात चिंता निर्माण झाली असून केंद्रीय गृहमंत्र्यांनी समोर येऊन जनतेला उत्तरं द्यावीत." राऊत यांनी दावा केला आहे की "माझ्यासह इतर काही राज्यसभा सदस्यांनी धनखड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु,आमचा त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. आम्ही त्यांच्या घरी देखील गेलो होतो. परंतु, आम्हाला आत जाऊ दिलं नाही."

संजय राऊत म्हणाले, "जगदीप धनखड ज्या पद्धतीने बेपत्ता झाले आहेत, त्यामुळे ही राजकीय कार्यकर्त्यांसाठी चिंतेची बाब आहे. या देशात चीन व रशियासारखा पॅटर्न राबवला जात आहे का? सरकारला नको असलेली माणसं गायब केली जात आहेत का? सरकारने तसा कायदा केला असेल तर आम्हाला त्याविषयी माहिती द्यावी. कोणी आमच्याविरोधात बोललं, वागलं, कृती केली तर आम्ही त्यांना गायब करू असं सरकारने एकदाचं स्पष्ट करून टाकावं."

शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, "उपराष्ट्रपती २१ जुलै रोजी सभागृहात आले होते. सभागृहात विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे व उपराष्ट्रपतींमध्ये 'ऑपरेशन सिंदूर'वरून शाब्दिक खटके उडाले. त्यानंतर उपराष्ट्रपतींनी सभागृहाचं काम दिवसभरासाठी तहकूब केलं. तेव्हा त्यांची प्रकृती उत्तम होती. त्यानंतर अचानक सायंकाळी सहा वाजता त्यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला, तेव्हापासून त्यांचा थांबपत्ता लागलेला नाही. एवढ्या मोठ्या संवैधानिक पदावर बसलेली व्यक्ती अचानक बेपत्ता होते, याबाबत गृहमंत्र्यांनी जनतेला माहिती द्यावी. किंवा त्यांनी जनतेला सांगावं की आपले उपराष्ट्रपती अमुक ठिकाणी सुखरुप आहेत. तुम्ही त्यांना भेटू शकता, त्यांच्याशी संवाद साधू शकता. "आतापर्यंत धनखड यांच्याशी कोणाचाही संपर्क होऊ शकलेला नाही? ते नजरकैदेत आहेत का? त्यांना बंदिवान करून ठेवलंय का? त्यांना काय झालंय? देशाचा नागरिक, संसदेतील सदस्य म्हणून आम्ही प्रश्न उपस्थित केले आहेत. सरकारने त्या प्रश्नांची उत्तरं द्यावी."

# राज ठाकरेंविरोधात याचिका करणाऱ्यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

मुंबईत गेल्या काही दिवसांपासून मराठी आणि अमराठी भाषेवरून वाद उफाळल्याचे दिसून येत आहे. मनेसेचे पदाधिकारी काही हिंदी भाषिक किंवा अमराठी व्यापाऱ्यांना किंवा मराठी न बोलणाऱ्यांना मारहाण करत असल्याचं सोशल मीडियातून समोर आलं आहे. यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठीच्या मुद्द्यावर मेळावा घेतला होता. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या भाषणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेत राज ठाकरे अमराठी लोकांविरुद्ध द्वेष पसरवत आहेत, असा आरोप करण्यात आला होता. तसेच मनसेची मान्यता रद्द करावी, अशी मागणी देखील याचिकेत करण्यात आली होती. आता राज ठाकरेंविरुद्धच्या याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे.



या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, "ही याचिका केवळ प्रचार आणि प्रसिद्धीसाठी दाखल करण्यात आली आहे." तसेच कोर्टाने याचिकाकर्त्यांना फटकारत विचारले की, "तुम्ही हायकोर्टात का गेला नाहीत? उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का?" अशा शब्दांत कोर्टाने याचिकेवर नाराजी व्यक्त केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, "या याचिकेवर सुनावणी करण्याची ही योग्य न्यायिक पातळी नाही. यासाठी याचिकाकर्त्यांनी आधी उच्च न्यायालयात दाद घ्यावी." त्यामुळे याचिकाकर्त्यांना हायकोर्टात जाण्याचे स्वातंत्र्य देत, सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका मागे घेण्याचे निर्देश दिले. परिणामी, याचिकाकर्त्यांनी याचिका मागे घेतल्याची माहिती समोर आली आहे.

# भारतात शिक्षण, आरोग्य सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर

## सरसंघचालक भागवतांनी व्यक्त केली चिंता

**इंदूर, दि. ११ वृत्तसंस्था**

देशात प्रचंड महागलेले शिक्षण आणि खर्चिक आरोग्य सुविधा याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी चिंता व्यक्त केली आहे. चांगल्या आरोग्य सुविधा स्वस्तात आणि सहज मिळायला हव्यात, असे म्हणत सरसंघचालक भागवत यांनी या मुद्द्यावर केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी इंदूरमध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये हे भाष्य केले.



"सगळ्यांना सर्वात जास्त गरज असते ती, आरोग्य आणि शिक्षणाची. पण, दुर्दैवाने परिस्थिती अशी आहे की, या दोन्हीही गोष्टी आज सर्वसामान्य माणसापासून दूर आहेत आणि आर्थिकदृष्ट्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत", असे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

"समाजाला आज अशा आरोग्य सुविधा हव्यात आहेत ज्या सहजपणे आणि स्वस्तात मिळतील. त्यासाठी अधिक जागा हव्या. बाजारीकरणामुळे केंद्रीकरणही होत आहे", अशी भूमिका त्यांनी मांडली.

"चांगले उपचार हवे असतील, तर लोकांना शहरांमध्ये जावं लागतं. कर्करोगावर उपचार होतात, असे भारतात आठ-दहाच शहरे आहेत. तिथे लोकांना जावं लागतं. तिथे उपचारांचा खर्च वेगळा असतो. तिथे येण्या-जाण्याचे खर्च वेगळा असतो. तिथ राहायचा खर्च असतो. कुटुंब चिंतेत असते की, पुढे काय होईल. एकाच वेळी या सगळ्या गोष्टी होत असतात", असे सरसंघचालक भागवत म्हणाले.

"आपण बघतो की, माणूस आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी घरही विकतो, पण तो चांगले शिक्षण देतो. चांगल्या ठिकाणी उपचार घेता यावेत म्हणूनही घर विकतो आणि त्याची व्यवस्था करतो", असेही ते म्हणाले.

# कबुतरखानाः हायकोर्टाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

सध्या मुंबईतील कबुतरखान्याचा प्रश्न चांगलाच तापला आहे, कबूतखाने बंद करण्याचे आदेश हाय कोर्टाकडून देण्यात आले आहेत. हाय कोर्टानंतर आता सुप्रीम कोर्टाचा निर्णय देखील समोर आला आहे.



कबूतखाने बंद करण्याचे आदेश हाय कोर्टानं दिले आहेत, त्यानंतर आता सुप्रीम कोर्टानं देखील हाय कोर्टाचा हा निर्णय कायम ठेवला आहे, सुप्रीम कोर्टाकडून हाय कोर्टानं कबुतरखान्यासंदर्भात दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार देण्यात आला आहे. त्यामुळे आता हाय कोर्टाच्या आदेशानुसार कबुतखाने बंदच राहणार आहेत.

# || युवा शक्तिला विधायक वळण आवश्यक ||

आज एकूण राजकीय परिस्थिती बघितली तर सैरभैर झालेली आहे. सत्तेसाठी राजकारण कसे सुरु आहे हे आपण बघतच आहे. त्यात महत्त्वाचे प्रश्न जसे बेरोजगारी, वाढती व्यसनाधीनता हा युवकांसमोरचा महत्त्वाचा प्रश्न आहे, तो मात्र बाजूला पडत आहे. जसे शिक्षित युवक आहे. त्यासमोर नोकरीचा प्रश्न आहे. तसेच जो शिक्षित नाही, परंतु शेती या फार मोठ्या व्यवसायात गुंतलेला आहे. त्याच्या डोळ्यासमोर शेती पिकवणे आणि ती टिकवून ठेवणे यातच तो गुरफटला आहे, त्यांचेही अनेक प्रश्न आहे ते सुद्धा बऱ्याच अंशी दुर्लक्षित राहतात. आपण म्हणतो देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा युवकांचा देश आहे. भारतात पासष्ट टक्के युवकांची संख्या आहे, असे म्हटले जाते. युवापिढीच्या क्षमतेवर, ताकतीवर भारतही जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे. आजच्या परिस्थितीत काही ठराविक युवा पिढीत नवीन शिकण्याची आवड आहे, जिद्दही आहे. देशाच्या विकासात त्यांचा सहभाग आहे. आज देशाच्या सीमेवर जाऊन आपल्या देशाच्या रक्षण करणारा देशभरातील युवकच आहे. त्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

जागतिक स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस "जागतिक युवा दिवस" म्हणून साजरा केला जातो. युवकांशी निगडीत काही विषयावर चर्चा घडवून आणली जाते. लिब्सन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ मध्ये पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या परिषदेत १२ ऑगस्ट जागतिक युवा दिवस साजरा करण्याची शिफारस केली गेली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महाससभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवस म्हणून साजरा होतो.

महविद्यालय, होस्टेलमध्ये अँडमिशन, जादा फीस आकारणी कडे लक्ष देऊन विद्यार्थी वर्गाला न्याय मिळवून देणे हे महत्वाचे काम संघटनेचे आहे. पण ह्यांचा अधिकतर वेळ वादातच जातो, बऱ्याच वेळा पोलिसांपर्यंतही वाद जातात. मुंबई, पुणे, दिल्ली आदि अनेक ठिकाणच्या मागील काही काळात तस्च दिसते. राजकीय पक्षाच्या युवा संघटना, शाखा आहेत. पण त्यात काही कोट्यवधी संख्येत युवकांचा सहभाग असतो. अगदीच नगण्य युवकांना कुठल्यातरी मंडळावर, सहकारी बँकेवर, जिल्हा परिषद, पंचायत समित्यावर त्यांची वर्णी लागते. त्यातही जवळचे कार्यकर्ते यांनाच संधी दिली जाते. बाकी युवक हे फक्त आधारस्तंभ असतात. त्यांना वापरून घेतले जात असते. हे आधारस्तंभ अधांतरीच असतात. त्यांच्या भवितव्याचा कुठलाही विचार त्यांच्याजवळ नसतो. आजचा युवक इंटरनेट, मोबाईल, इन्स्टाग्राम, फेसबुक, वॉट्सप अशा सोशल मिडियाच्या जाळ्यात नको तितका अडकला आहे म्हटल्यास




अतिशयोक्ती ठरणार नाही. हवा तेवढा उपयोग न घेता, नको तेवढा दुरूपयोग केला जातो. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात युवक त्यात अडकून आत्ममग्न झालाय. त्यांचा चुकीच्या दिशेने वापर होतोय. कलाकार, खेळाडू, सेलीब्रेटींना मोठ्या रकमेचा मोबदला देवून ऑनलाईन गेमच्या जाहिराती केल्या जातात व तरुणांना आकर्षित केले जाते. हे गेम म्हणजे एक जुगारच असतो, तरुणांना विधायक कार्याकडे ओढण्याऐवजी हे असले प्रकार तरुण पिढीची दिशा बदलून टाकत आहे. त्यांच्याभोवती अशा गेमचा विळखा घातला गेला आहे. त्यात तरुणपिढी बरबाद होत आहे. या गोष्टीकडे गंभीरपणे बघितले गेले पाहिजे आणि अशा प्रकारांवर बंदी आणायला हवी आहे. अनेक राज्यात यावर बंदी आहे. सरकारला त्याची आवश्यकता वाटत नाही का? युवकांच्या विकासाच्या योजनांचा विचार करत असताना अशा गोष्टींकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. संवाद कमी होतोय. वाचन कमी झालय. राजकीय पक्ष तरूणांचा वापर निवडणूक कामी मोठ्या प्रमाणावर करुन घेतो. त्या बदल्यात काय मिळते? ढाब्यावर मनसोक्त जेवण, अर्थातच खाणे पिणे. महिनादोन महिने फुकट मिळते, पण व्यसन कायम चिकटते. यामुळेच खुप मोठा बेरोजगार तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन पुढाऱ्यांमागे धावण्यात आपली उमेदवारी वर्षे वाया घालवतोय. अनेकांचे आयुष्य दिशाहीन झाले आहे. कारण कुठली न कुठली निवडणूका असतेच. रोजगार नसलेला लाखो करोडोच्या संख्येने युवक ह्यात गुरफटला आहे. आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करुन घेतला जातोय ही गंभीर बाब आहे. त्यातच त्यांच्या समाजिक जाणिवा लोप पावत आहेत. समाजातला अत्याचार, भ्रष्टाचारा बद्दल त्याला काही घेणे देणे नाही. तो पेटून उठत नाही. त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत. घरातल्या घरात खूनाचे प्रकार घडताय .कुठून आली आहे ही अस्वस्थता? रोजगार नसल्याने फार मोठ्या संख्येने युवक अस्वस्थ आहे. ज्या ठिकाणी संधी उपलब्धता असते, तिथे तो पोहचत नाही किंवा टिकाव लागत नाही. धुम्रपान, मद्यपानाचे आहारी जात आहे. गुटख्यावर बंदी असूनही अनेक ठिकाणी लाखोंच्या संख्येने साठा पकडला जातो.बार, पब, क्लबमध्ये युवा पिढी गुरफटत आहे. ड्रग्ज, अमली पदार्थ सेवन वाढते आहे. त्यामुळे युवापिढी बरबाद होतेय ह्याकडे दुर्लक्ष होते आहे. एकीकडे शेतकरी युवक वर्ग आहे. सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराने तो गांजला आहे. वैचारिक क्षीणतेमुळे अनेक युवक आत्महत्या करताहेत. खर तर युवाशक्तित खूप सामर्थ्य नक्कीच आहे.



विशेष
दिलीप देशपांडे
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७

स्वामी विवेकानंदाच्या जयंतीलाही राष्ट्रीय युवा दिवस साजरा करतो. त्यांचा युवाशक्तिवर खूप विश्वास होता. युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे. त्यांना संस्कारक्षम, कणखर, राष्ट्राप्रती, समाजाप्रती प्रेम असणारा निर्व्यसनी युवक अपेक्षित होता. युवा दिन साजरा करतांना ह्या सर्व गोष्टींची चर्चा, सर्वक्षेत्रातील युवकांना, युवा संघटनांना व्यासपीठ उपलब्ध करुन द्यायला हवे. युवकांची मन की बात ओळखायला हवी. शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यायला हवा आहे. नवनविन संधी प्राप्त करुन द्यायला हव्यातच. हाच त्यावर एकमेव उपाय आहे. केवळ घरी बसल्या बसल्या बेरोजगारी भत्ता देण्याची योजना न आखता, त्यांच्या हाताला काम देणे महत्त्वाचे आहे. नाही तर, राष्ट्राची ताकद म्हणून ज्या युवकांकडे आपण पहातो, ती युवापिढी राजकारण, सोशल मिडियाचे, व्यसनाचे फेऱ्यात बरबाद होणार हे निश्चित. युवा दिन साजरा करतांना शासनाने-राजकीय नेत्यांनी ह्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यायला हव्या. युवा शक्तिला, युवा संघटनांना विधायक वळण द्यायला हवे हे मात्र नक्की. युवक हेच देशाचे खरे भांडवल आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. म्हणूनच त्यांच्या समस्यांकडे त्यांना शिक्षणाप्रमाणे रोजगारसंधी मिळेल याकडे लक्ष दिल्यास युवकही परदेशी शिक्षणाकडे आकर्षित न होता देशातच राहून आपल्या ज्ञानाचा फायदा देईल यात शंका नाही. हा दिवस साजरा करत असताना एकूणच युवा पिढीला चांगले शिक्षण, योग्य ती दिशा आणि मार्गदर्शन मिळायला हवे. प्रामुख्याने युवा पिढीच्या प्रश्नावर विचार व्हायला हवा. ठिकठिकाणी युवकांचे मेळावे आयोजित करून त्यांचे प्रश्न जाणून घेऊन ते मार्गी लावले पाहिजे आणि राजकीय स्वार्थासाठी युवक व्यसनाधीन होणार नाही ही दक्षता घ्यायला हवी.

## महत्त्वाचे

### अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी महावितरणतर्फे शिबिरे

**नाशिक ।** अनुकंपा तत्वावरील नोकरीसंदर्भात महावितरणतर्फे नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे आणि कोकण प्रादेशिक विभागाचे उपमहाव्यवस्थापक सुशील पावसकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिबिरे आयोजित करण्यात आली होती. महावितरण मधील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांकरिता अनुकंपा तत्त्वावरील नोकरी संदर्भातील शंका, अडचणी व तक्रारी दूर करण्यासाठी शिबिरात थेट संवाद साधण्यात आला. नाशिक मंडळ कार्यालयातर्फे आयोजित शिबिरास अधिक्षक अभियंता राजेश थूल, नाशिक परिमंडळाचे सहायक महाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे, नाशिक मंडळ व्यवस्थापक सुधा वाजपेयी तर मालेगाव मंडळ कार्यालय येथे नाशिक परिमंडळाचे वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद फुलकर, व्यवस्थापक सुदीप साळवे, अहिल्यानगर मंडळ कार्यालय येथे व्यवस्थापक रेणुका सूर्यवंशी तर संगमनेर विभाग येथे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सर्व अवलंबितांना महावितरणची अनुकंपा तत्त्वाबाबतची माहिती पुस्तिका देण्यात आली.

### पेठरोड परिसरात आगीत घरातील जीवनावश्यक वस्तू जळून खाक

**नाशिक ।** पेठरोड परिसरातील रोहिणी नगर येथे एका घराला अचानक लागलेल्या भीषण आगीमध्ये जीवित हानी झाली नसली तरी घरातील दहा लाखांच्या जीवनावश्यक वस्तूंपैकी जवळपास पाच लाखांच्या वस्तू जळून खाक झाल्या आहे. अग्निशमन दलाच्या दोन बंबांनी आगीवर नियंत्रण मिळवले. पेठरोड परिसरातील रोहिणी नगर येथे राहणाऱ्या विजयकुमार जयस्वाल यांच्या घराला आग लागल्याची घटना घडली. यावेळी घरात कोणी नसल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळा बाहेर दिसू लागल्याने परिसरातील नागरिकांनी पंचवटी अग्निशमन दलाला फोन करून आग लागल्याची माहिती दिली. आग लागल्याची माहिती मिळताच पंचवटी विभागीय कार्यालयातील अग्निशमन दलाचे टीम लीडर एस. जे. कानडे, लिडिंग फायरमन एम. एच. गायकवाड, एस. सी. मेन्द्रे, डी. पी. पाटील, बाळासाहेब लहांगे, वाहन चालक ए. बी. सरोदे, बी. व्ही. काकडे, व्ही. एम. शिंदे यांच्यासह ट्रेनी कर्मचाऱ्यांनी दोन आग विझविण्याचे बंब घेऊन घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्यास सुरुवात केली. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवत किचन आणि हॉल आगीपासून वाचवले.

### शाळेची पाणीपट्टी भरण्यासाठी द्यानद्यान करणार भीक मागो आंदोलन

**नाशिक ।** मालेगाव तालुक्यातील टोकडे येथील सत्यवती कौर माध्यमिक विद्यालयाकडे पाणीपट्टीचे ५१,६०५ रूपये थकले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही रक्कम वसुलीसाठी थेट पाणी तोडण्याचा इशारा दिला आहे. शाळा व्यवस्थापनाने याकडे दुर्लक्ष केल्याने सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानद्यान यांनी भीक मागो आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्याध्यापक सुनील धोंडू फरस यांनी सन २०१७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाणीपट्टीचा एकही रुपया भरलेला नाही. यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वेळोवेळी लेखी नोटिसा दिल्या. मात्र मुख्याध्यापकांनी त्या नोटिसांकडे दुर्लक्ष करून त्यांना केराची टोपली दाखवली. ही रक्कम न भरल्यास पाणी तोडले जाणार असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. विद्यार्थ्यांचे हाल होऊ नयेत या हेतूने द्यानद्यान यांनी जनतेसमोर 'भिक मांगो आंदोलन' करण्याचा निर्णय घेतला आहे.

## नाशिकमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा अभिमानाचा क्षण : लोढा



**नाशिक ।** श्री ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स महाराष्ट्र प्रांत चतुर्थ झोन आयोजित राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ रविवारी (दि. १०) नाशिक येथील धनदाई बँक्वेट हॉल येथे संपन्न झाला.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व महाराष्ट्र प्रांत चतुर्थ झोनचे अध्यक्ष मोहनलाल लोढा यांनी संपूर्ण राज्यातून आलेल्या अतिथी व गुणवंतांचे स्वागत केले व संपूर्ण नाशिक साठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ब्रिजलाल कटारिया यांनी यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष ब्रिजलाल कटारिया यांनी मुलांच्या कलागुणांना वाव दिला तर मुलांची बौद्धिक क्षमता वाढते. मुलं शिक्षणात पुढे जातात ज्या मुलांना पुरस्कार मिळाले त्यांचे खरोखर अभिनंदन केले पाहिजे आणि ज्यांना नाही मिळाले त्यांनी पुढच्या वेळी आपल्याला कसा पुरस्कार मिळेल हे पाहून अभ्यास करावे असे नमूद केले. विहारधाम योजनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी मोहनलाल लोढा हे नेहमीच सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असतात व त्यांनी अतिशय भव्य अशा सत्कार समारंभाचा आयोजन केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून आलेल्या दहावी-बारावी व उच्चशिक्षित अशा 151 गुणवंत विद्यार्थ्यांचा, जैन प्रतिक्रमण या कठीण सूत्र कंठस्थ करणाऱ्या 21 लहान बालकांचा व 21 आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. राज्यस्तरीय शिक्षक सेवा रत्न पुरस्कार राजेश मुनोत अध्यक्ष अहिंसा एज्युकेशन इन्स्टिट्यूट दोंडाईचा धुळे यांना देण्यात आला.या कार्यक्रमास विजय टाटिया, सीए अक्षय राका, संजय बाफना, नंदलाल शिंगवी, विनोद कुचेरिया आशिष भन्साळी यांनी विशेष सहयोग दिला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विशेष अतिथी मंगलचंद साखला, शांतीलाल चोरडिया, सुमेरकुमार काळे, संजय कोठारी, महावीर भन्साळी ,नंदकिशोर साखला ,ललित मोदी, सुनील चोपडा, जे.सी. भंडारी, अजित सुराणा, संतोष मंडलेचा, डॉ. किरण धाडीवाल, दिलीप बोरा, संजय बाफना, राजेंद्र टाटिया, पोपटलाल लोढा, अनिल लोढा, अनिल नहार उपस्थित होते.

राष्ट्रीय अध्यक्ष आत्मज्ञान योजना शशिकुमार (पिंटूभाऊ) कर्नावट, महामंत्री शांतीकुमार दूगड, वरिष्ठ उपाध्यक्ष पद्मम राका, कोषाध्यक्ष हेमराज खाबिया, उपाध्यक्ष लखमीचंद पारख, मोतीलाल चोरडिया , जिल्हाध्यक्ष नंदलाल शिंगवी, प्रकल्प संयोजक सीए लोकेश पारख, राजेंद्र कुमट, बालचंद चोरडिया, भूषण लोढा, राजेंद्र डूंगरवाल यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प संयोजक प्रा. सीए. लोकेश पारख यांनी केले व आभार महामंत्री शांतीलाल दुगड यांनी मानले. लहान बालकांनी अवघड प्रतिक्रमण सूत्र कंठस्थ केल्याबद्दल त्यांना संजय बाफना यांच्यामार्फत चांदीचे नाणे भेट करण्यात आले. यावेळी बोलताना कांतीलाल चोपडा यांनी कार्यक्रमासाठी बऱ्याच दानशुरांचे कार्यक्रमास सहकार्य दिल्याचे सांगितले. यावेळी शशिकांत कर्नावट यांनी वयानुसार लोढाजी खूप जोमाने काम करत आहेत असे नमूद केले. यावेळी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी सांगितले की, लोढा यांनी आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमास आम्ही हजर राहतो.

## 'वंदे भारत एक्सप्रेस'चे मनमाड येथे जल्लोषात झाले स्वागत!

### प्रवाशांसाठी केवळ ४ तासांत पुणे प्रवासाची सोय...



**मनमाड ।** नागपूर अजनी-पुणे मार्गावर धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे मनमाड रेल्वे स्थानकावर अभूतपूर्व जल्लोषात स्वागत करण्यात आले. रेल्वे स्थानकावर फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचे गजर आणि भारतमाता की जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मनमाड जंक्शनवर फलाट क्रमांक चारवर गाडी दाखल होताच नागरिकांचा उत्साह शिगेला पोहोचला.

मनमाड जंक्शनच्या प्रवेशद्वारावर विशेष शामियानात भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतं व नृत्य सादर करत वातावरण भारावून टाकलं. नागपूर अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या शुभारंभानिमित्त शालेय पातळीवर निबंध आणि चित्रकला स्पर्धांचाही आयोजन करण्यात आला होता, ज्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागपूर अजनी ते पुणे या लांब पल्ल्याच्या नियमित मार्गावर धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून करण्यात आले. मनमाड ते पुणे ३०८ किलोमीटर अंतर असून 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार करण्यात आलेल्या या गाडीमध्ये ५४६ सीट्स असलेले चेअर कार कोच असून एक्झिक्युटिव्ह क्लाससह एकूण ५९० प्रवाशांची बसण्याची क्षमता आहे. मनमाड–पुणे किरकोट भाडे ९६०, एक्झिक्युटिव्ह क्लास भाडे १९५०, गाडीचा सरासरी वेग ७३ किमी/तास, मनमाड–पुणे प्रवास वेळ फक्त ४ तास ही गाडी पोहचणार आहे. वंदे भारत गाडीच्या आगमनासाठी मनमाड रेल्वे स्थानकात विशेष सजावट करण्यात आली होती. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रेल्वे सुरक्षा दल (RPF), रेल्वे लोहमार्ग पोलीस, शहर पोलीस कर्मचारी, प्रशिक्षित श्वान पथक यांची तैनाती करण्यात आली होती. नागरिकांमध्ये गाडी पाहण्याची आणि त्यात बसून फोटो काढण्याची उत्सुकता विशेषतः लक्षणीय होती. वंदे भारत एक्सप्रेस मनमाड स्थानकात येताच ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत गाडीचे स्वागत करण्यात आले.या समारंभात रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी योगेश गराड, सुनील गरावाल, सीनियर डीएमओ के.एन. क्षत्रिय, वाणिज्य विभाग प्रमुख विवेक भालेराव, बी.एल.मीना यांच्यासह अनेक रेल्वे अधिकारी उपस्थित होते. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन पांडे, उपाध्यक्ष पंकज खताळ, शहराध्यक्ष संदीप नरवडे, पंकज खताळ, प्रमोद पाचोरकर व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनमाड ते पुणे ३०८ किलोमीटर अंतर असून मनमाड–पुणे व पुणे–मनमाड या प्रवासासाठी केवळ ४ तास लागणार असल्याने आता प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जलद, सुरक्षित आणि आधुनिक सुविधांनी युक्त असलेल्या वंदे भारत एक्सप्रेसमुळे प्रवासाचा अनुभव अधिक आरामदायक होणार आहे. मनमाडकरांसाठी ही सेवा एक सुवर्णसंधी ठरणार आहे, असे प्रतिपादन यावेळी अनेकांनी केले.

## नाशिक जिल्हास्तरीय 'अस्मिता खेलो इंडिया' महिला वेटलिफ्टिंग स्पर्धा

**मनमाड ।** भारतीय क्रीडा प्राधिकरण, भारतीय वेटलिफ्टिंग संघटना, नाशिक जिल्हा वेटलिफ्टिंग संघटना व जय भवानी व्यायाम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मनमाड येथे आयोजित करण्यात आलेल्या नाशिक जिल्हास्तरीय पहिल्या "अस्मिता खेलो इंडिया" महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील महिलांनी सहभाग घेत सशक्त महिला खेळाडूंचा उत्सव साजरा केला.

या स्पर्धेचे उद्घाटन सिद्धी क्लासेसच्या संचालिका भाग्यश्री दराडे, छत्रे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता पोद्दार, माजी नगराध्यक्ष योगेश पाटील, जय भवानी व्यायाम शाळेचे पोपट बेदमुथा, डॉ. दत्ता शिंपी, राजेश परदेशी, आंतरराष्ट्रीय खेळाडू निकिता काळे, आकांक्षा व्यवहारे आणि वेटलिफ्टिंग प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. स्पर्धा आठ वजनी गटांमध्ये घेण्यात आली. खालीलप्रमाणे निकाल जाहीर करण्यात





आले. 44 किलो गट प्रथम- दिव्या सोनवणे, द्वितीय- श्रेया सोनार, तृतीय- भाग्यश्री पवार, 48 किलो गट, प्रथम- विनाताई आहेर, द्वितीय- श्रावणी पुरंदरे, तृतीय- वैष्णवी शुक्ला, 53 किलो गट, प्रथम- मेघा आहेर द्वितीय- पूर्वा मौर्य, तृतीय- शामल तायडे, 58 किलो गट प्रथम- आर्या पगार, द्वितीय- मुग्धा माळी तृतीय- कावेरी वाबळे, 63 किलो गट प्रथम- प्रांजल आंधळे, द्वितीय- साक्षी पवार, तृतीय- हर्षिता कुंगर,69 किलो गट प्रथम- अक्षरा व्यवहारे, द्वितीय- श्रावणी सोनार, तृतीय- श्रावणी मंडलिक, 77 किलो गट प्रथम- करुणा गाढे, द्वितीय- प्रांजल कुनगर, तृतीय- ऐश्वर्या गांगुर्डे, 77 किलो वरील गट- प्रथम- कस्तुरी कातकडे, द्वितीय- श्रद्धा माळवतकर, तृतीय- करिष्मा शहा, मेघा संतोष आहेर हिने उत्कृष्ट कामगिरी करत "स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू" म्हणून बहुमान पटकावला. स्पर्धेसाठी तांत्रिक अधिकारी म्हणून डॉ. विजय देशमुख, राजेंद्र सोनवणे, सुनील दळवी, योगेश चव्हाण, योगेश महाजन, तुषार सपकाळे, कल्पेश महाजन, भाऊसाहेब खरात, पंकज त्रिवेदी यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे प्रास्ताविक वेटलिफ्टिंग प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांनी केले. आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर, विनोद सांगळे, डॉ. शरद शिंदे, महेंद्र शिरसाठ, आनंद काकडे, प्रशांत सानप, डॉ. दत्ता शिंपी, कुणाल गायकवाड, मुकेश निकाळे, मुकुंद आहेर, जयराज परदेशी, पूजा परदेशी, खुशाली गांगुर्डे, नूतन दराडे, पवन निरभवणे, सुनील कांगणे, सुरेश नेटारे आदी मान्यवरांनी स्पर्धेसाठी मोलाचे योगदान दिले.

# 'शंभो हर हर... बम बम भोले...

## लाखो शिवभक्तांनी पूर्ण केली शिवस्वरूप ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा



**नाशिक ।** "शिव हर शंकर नमामि शंकर शिवशंकर शंभो। हे गिरीजापती भवानी शंकर शिवशंकर शंभो।"... असा शिवशंकरचा जयघोष करीत लाखो शिवभक्तांनी तिसऱ्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधन पवित्र ब्रह्मगिरी पर्वताची प्रदक्षिणा केली.

त्यासाठी रविवारी दुपारपासूनच शिवभक्तांचे जत्थे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरकडे निघाले होते. काही शिवभक्तांनी रविवारी रात्री तीर्थराज कुशावर्त कुंडात स्नान करून प्रदक्षिणा मारायला सुरुवात केली. रामप्रहरी या मंडळींनी ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा पूर्ण केली. काही मंडळींनी पहाटे, सकाळी प्रदक्षिणेला सुरुवात केली तर अनेकांनी आपापल्या सोयीने प्रदक्षिणा मारली. रविवारी दुपारपासून सुरू असलेला हा प्रदक्षिणा कार्यक्रम सोमवारी रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. त्यामुळे त्र्यंबकेश्वरला गर्दी उसळली होती. अवघ्या भारत वर्षातून आलेल्या लाखोंच्या संख्येने शिवभक्तांनी आद्य ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वरांचे दर्शन घेतले. त्यामुळे त्र्यंबकेश्वर येथे जणू शिवभक्तांचा महासागर उसळला होता. खासगी वाहने खंबाळे शिवारात पार्क करण्यात आली होती. त्यामुळे तेथूनच शिवभक्त पायी जात होते. एसटी महामंडळाने श्रावणी सोमवारनिमित्त जादा बसेसची सोय केली होती. त्यामुळे बस स्टॉपवरही खूप मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग दर्शनासाठी रविवारपासून नेहमीप्रमाणे रांगा लागल्या होत्या. त्या सोमवारी रात्री उशिरापर्यंत कायम होत्या. तिसऱ्या सोमवारची पर्वणी साधत दर्शनासाठी शिवभक्तांनी खूपच मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. त्यामुळे मंदिर पहाटेपासूनच खुले करण्यात आलेले होते. दरम्यान, रविवारपासून दुपारपासून भाविकांचा लोंढा श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरकडे जाताना दिसत होता. रिमझिम पावसाच्या सरीही त्यांचा उत्साह अधिक द्विगुणित करीत होता. सालाबादप्रमाणे तिसऱ्या सोमवारीही शिवभक्त भक्तांनी शिवस्वरूप ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा पूर्ण केली. सुट्टीचा दिवस असल्याने प्रदक्षिणा करण्यासाठी यंदा मोठी गर्दी होती. यामध्ये युवकांचा भरणा खूपच मोठ्या प्रमाणात होता. नाशिक येथून येणारी वाहने खंबाळे, तळेगाव, अंजनेरी येथे तर इगतपुरी, घोटी, मुंबईमार्गे येणारी वाहने पहिणे वाहनतळावर तसेच जवाहर, मोखाडा, ठाणे, गुजरात, गिरणारे आदी ठिकाणांहून येणारी वाहने आंबोली वाहनतळावर लावण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना कुठलीही तसदी जाणवली नाही. रविवारी दुपारपासून तर सोमवारी रात्री उशिरापर्यंत भाविकांचा ओघ सुरू होता.

यंदा दोन लाखापेक्षा अधिक शिवभक्तांनी पवित्र ब्रम्हगिरीची प्रदक्षिणा पूर्ण केल्याचा अंदाज वर्तविला जात होता. ठिकठिकाणी भाविकांसाठी फराळाचे वाटप करण्याची सुविधा दानशूर मंडळींनी केली होती.

### सोमेश्वर-कपालेश्वर गर्दीने फुलले

श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारचे औचित्य साधत लाखो शिवभक्तांनी शहर-जिल्ह्यातील सर्वच महादेव मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली होती. यानिमित्त सर्वत्र धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादाची सर्वत्र सोय होती. सोमेश्वर येथील महा देव मंदिरातला तर जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच गोदाघाटावरील कपालेश्वर महादेव मंदिरात रविवारी रात्री उशिरापासून शिवभक्तांच्या रांगा लागल्या होत्या. हा सिलसिला सोमवारी रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. श्रावणी सोमवारनिमित्त लक्षावधी भाविकांनी पवित्र गोदास्नानही केले. यानिमित्त सर्वच शिवालये शिवभक्तांनी फुलल्याचे दिसून आले.

### श्रावणातील झगमगाट..!



तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त गोदावरी घारपुरे घाटावरील पुरातन सिद्धेश्वर महादेव मंदिरास केलेली विद्युत रोषणाई...

## ऑफिस गृपतर्फे खिचडी वाटप; हजारो भाविकांनी घेतला लाभ

**नाशिक ।** श्रावण महिन्यातील तिसरा सोमवारी नाशिक शहरात अनेक ठिकाणी खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात आले.

अनेक मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. असाच एक खिचडी वाटपाचा कार्यक्रम पंचवटी कारंजा येथील ऑफिस गृपतर्फे आयोजित करण्यात आला . सोमवारी सकाळी १०. ३० वाजता पंचवटी कारंजावरील ऑफिस ग्रुपच्या समोर हा कार्यक्रम झाला.



यावेळी ऑफिस ग्रुपचे सदस्यांनी शिवभक्तांना खिचडीचे वाटप केले. हजारो शिवभक्तांनी या खिचडी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### महत्त्वाचे

## हिंदू जनसंपर्क कार्यालयाने ज्येष्ठांना घडविली धार्मिक सहल

**राजीवनगर ।** शिवभक्तीचे पवित्र पर्व अर्थातच श्रावण मास या पवित्र पर्वाचे औचित्य साधत हिंदू जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने सर्मथ



ज्येष्ठ नागरिक संघातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्याच्या संध्याकाळी एकदिवसीय धार्मिक सहल घडवून आणली. समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब केंगे, पंचमुखी दास मारुती मंदिराचे अध्यक्ष शिवाजी काकाड, अजित अध्यापक, किरण दीक्षित, रवींद्र पाटील आदींच्या हस्ते नारळ वाढवून बसेस दर्शनासाठी मार्गस्थ झाल्या. या सहलीत १५१ ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. सहलीत ज्येष्ठां नागरिकांनी भजन गायन गाडीतच रंगले. आद्य ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, भद्रा मारुती, निसर्गरम्य पर्यटन स्थळ म्हैसमाळ, गिरजाई माता, बालाजी मंदिर येथे दर्शन घेऊन, सर्वांनी देवाच्या चरणी भक्तीभाव अर्पण केला. या धार्मिक सहलीचे आयोजन हिंदू जनसंपर्क कार्यालयाचे सागर देशमुख व पूजा देशमुख यांनी केल्याबद्दल ज्येष्ठांनी आशीर्वाद दिले. धीरज जोशी, संदीप सोनवणे, प्रतिक फड, मयुर औटे आदींनी सहल यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# देशाच्या मूळ संस्कृती, परंपरा, नैसर्गिक संपत्तीचा खरा रक्षक आदिवासी समाज : ना. भुजबळ





**मुंबई/नाशिक ।** आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन हा दिवस केवळ आदिवासी समाजासाठी नाही, तर भारताच्या प्रत्येक नागरिकासाठी अभिमानाचा दिवस आहे. कारण आदिवासी समाज हा आपल्या देशाच्या मूळ सांस्कृतिचा, परंपरांचा आणि नैसर्गिक संपत्तीच्या जतनाचा खरा रक्षक आहे, असे प्रतिपादन नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनानिमित्त औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या "वनरंग आदिवासी संस्कृतीचा गौरव" या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र विधासभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आ. हिरामण खोसकर, आ. सचिन अहिर, आ. प्रसाद लाड, पद्मश्री राहीबाई पोपरे अभिनेते भाऊ कदम, नागेश भोसले, मेघा घाडे आणि अनेक क्षेत्रात काम करणारे मान्यवर तसेच राज्यातील विविध भागातून आलेले आदिवासी बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले की, भारत छोडो आंदोलनाची सुरवात मुंबईतुन झाली. महात्मा गांधी यांच्यापासून ते अरुणा असफ अली, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यापर्यंत सर्वांनीच या लढ्यात आपले योगदान दिलेच; पण या आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजाने केवळ हातभारच लावला नाही तर अनेक वेळा नेतृत्वाची धुरा उचलली बिरसा मुंडा यांनी. इंग्रजांच्या विरोधात १८९९-१९०० मध्ये उलगुलान म्हणजेच महाआंदोलन उभे केले. हे आंदोलन केवळ ब्रिटीशांविरुद्ध नव्हते, तर जमिनीवर हक्क, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यासाठीचे ते युद्ध होते. महाराष्ट्रातील राघोजी भांगरे यांनी देखील आदिवासींच्या हक्कांवर इंग्रजांनी आणलेली गदा पाहुन मोठे बंड केले. राघोजीचे बंड पाहुन इंग्रजांनी त्या काळी ५ हजार रुपयाचे बक्षीस हे राघोजीला पकडणाऱ्यांना घोषीत केले पण पुढे तब्बल १० वर्ष ते इंग्रजांच्या तावडीत सापडले नाहीत. शेवटी १८४८ साली त्यांना पकडले आणि ठाण्यात त्यांना फाशी देण्यात आली. आदिवासी समाजात तंट्या भील, राणी दुर्गावती, अल्लुरी सीताराम राजू पण अशा असंख्य आदिवासी वीरांनी आपले प्राण गमावले, जेणेकरून आपण आज स्वातंत्र्याचा श्वास घेऊ शकतो. पुढे ते म्हणाले की, पर्यावरण संरक्षणाची चर्चा तर आत्ता सुरू झाली पण माझा आदिवासी समाज पिढ्यांपिढ्या निसर्ग वाचवत आला आहे. आदिवासी समाज हा निसर्गाशी एकरूप होऊन जगणारा समाज आहे. त्यांचे जीवन हे जल -जंगल-जमीन सोबत जोडलेले आहे. आदिवासी समजतील लोककला, नृत्य, वेशभूषा, संगीत आणि सण हे भारतीय संस्कृतीचे समृद्ध चित्र आपल्याला दाखवतात. जेव्हा जग शहरीकरणाच्या मागे पळत होते, तेव्हा आदिवासी समाजाने निसर्गाशी मैत्री करून जगण्याचा आदर्श दिला.

यावेळी बोलताना ना.झिरवाळ म्हणाले की आदिवासी समाजाची जीवनशैली ही निसर्गाची मिळती जुळती आहे. अनेक पालेभाज्या, झाडे यांच्या बाबतीत माहिती असणारा हा आदिवासी समाज आहे. अनेक औषधी वनस्पती देखील आमच्या आदिवासींना माहिती आहे. आदिवासी समाजातील विविध प्रथा, संस्कृतीबाबत झिरवाळ यांनी यावेळी माहिती दिली. कार्यक्रमामध्ये आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे नृत्य देखील सादर करण्यात आले.

### क्राईम...

## रक्षाबंधनाच्या दिवशी विहिरीत आढळला मृतदेह



**देवळा ।** खडकतळे येथून दोन दिवसांपासून बेपत्ता असलेली नववीत शिकणारी पल्लवी समाधान पगार (वय १४) या अल्पवयीन मुलीचा चा मृतदेह रक्षाबंधनाच्या दिवशी रोजी घराशेजारील विहिरीत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. या हृदयद्रावक घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तिला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा निर्णय नातेवाईकांनी घेतला होता मात्र उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी चर्चा करुन नातेवाईकांची कशी बशी समजूत काढल्यानंतर उशिरा पल्लवीवर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याबाबत सविस्तर वृत्त असे की, खडकतळे (ता. देवळा) येथील पल्लवी समाधान पगार ही नववित शिकणारी मुलगी गुरुवार (ता.७) रोजी कुणालाही काही न सांगता घरातून बाहेर पडली होती. ती उशिरा पर्यंत घरी परत न आल्याने कुटुंबीय व नातेवाईकांनी परिसरात शोध घेतला मात्र ती कुठेही आढळुन न आल्याने घरच्यांनी देवळा पोलिस ठाण्यात पल्लवी बेपत्ता झाल्याची नोंद दाखल करण्यात आली होती. सलग दोन दिवस दिवसांच्या शोधानंतर शनिवार दि.९ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास पल्लवीचे आजोबा दामू पगार शेतात गेले असता घराशेजारील विहिरीत तिचा मृतदेह तरंगताना दिसून आला. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते, पोलीस उपनिरीक्षक मनोज कुवर व पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह विहिरीतून बाहेर काढून देवळा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. यावेळी मिळून आलेल्या सुसाईड नोटमध्ये तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहे. मात्र या दरम्यान तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी संशयितांवर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर शवविच्छेदन झाल्यावर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला व रात्री उशिरा पल्लवी वर अंत्यसंस्कार करण्यात आले. तिच्या पश्चात आई, वडील, भाऊ, आजी, आजोबा असा परिवार आहे.

# ठाकरे गटाचे सरकार विरोधात नाशकात जनआक्रोश आंदोलन

**नाशिक ।** महायुती सरकारमधील मंत्र्यांचे नवनवीन कारनाने उजेडात आले असून भ्रष्टाचारही बोकाळला आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाने त्याविरोधात काल (दि.११) जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. आमदार संजय गायकवाड यांचे कॅन्टिनमधील कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरण, तत्कालिन कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा अधिवेशनादरम्यान रम्मी खेळतानाचा व्हायरल झालेला व्हिडिओ, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा लेडीज बारचा परवाना, असे एक ना अनेक कारनामे दरम्यानच्या काळात उघड झाले आहे. सरकारकडून आपापल्या मंत्र्यांना वाचविण्याचा प्रयत्नही केला गेला. भ्रष्टाचार उघडकीस येत असतानाही त्यावर पांघरून घातले जात असल्याने ठाकरे गट आक्रमक झाला. दुपारी बाराला सर्वच प्रमुख पदाधिकारी शालीमार येथील शिवसेना कार्यालयाजवळ जमले. त्यानंतर पायी चालत पुतळ्यापर्यंत आले. हातात पक्षप्रमुख उध्दव ठाकरे,




आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत यांची छबी असलेले फलक लक्ष्यवेधी ठरले. सोबतच आमदार गायकवाड, माजी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, खासदार निशिकांत दुबे यांचीही छबी असलेले फलक झळकावून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी सरकारविरोधात तुफान घोषणाबाजी करण्यात आली. संपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, जयंत दिंडे, जिल्हाप्रमुख डि.जी.सुर्यवंशी, महानगरप्रमुख प्रथमेश गिते, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, माजी नगरसेविका माधुरी जाधव यांच्यासह शेकडो पदाधिकारी सहभागीझाले होते.

# तिसऱ्या श्रावणी सोमवारी दर्शनासाठी कपालेश्वरी भाविकांचा जनसागर

**नाशिक ।** तिसऱ्या श्रावणी सोमवारचे महादेवाचे दर्शन घेण्यास अधिक महत्व असल्याने सोमवारी शिवभक्त आणि भाविकांनी शिवमंदिरांमध्ये दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. गोदाघाटावरील शिवमंदिरे आणि कपालेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी झाल्याचे दिसून आले. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पंचवटी परिसरातील गंगाघाटावर असलेल्या कपालेश्वर मंदिरात तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे बम बम भोलेच्या गजरात गोदाघाट परिसर दुमदुमून गेला होता. दूध आणि बेलाच्या पानाने दिवसभर भोलेचा अभिषेक सुरु होता. तर संध्याकाळी निघालेल्या



पालखी मिरवणुकीत देखील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भाविकांच्या सोयीसाठी कपालेश्वर संस्थानच्या वतीने याठिकाणी दर्शनासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. नंदी नसलेले जगातील एकमेव महादेवाचे मंदिर असल्याने कपालेश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. कपालेश्वर महादेवाला पहाटे साडे तीन वाजता अभ्यंग स्नान घालून चार वाजता मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. त्यानंतर दुग्धाभिषेक करण्यात येऊन शिवमूठ वाहण्यात आली. दुपारी एक वाजता कपालेश्वर महादेवाला स्नान घालून शृंगार करण्यात आला. त्यानंतर महादेवाला अर्पण करण्यात येणाऱ्या दुधाचे संकलन करून ते शिवभक्तांना प्रसाद स्वरूपात वाटण्यात आले. दुपारी चार वाजता कपालेश्वर महादेवाची परंपरांगत मार्गावरून पंचमुखी मुखवट्याची पालखी मिरवणूक काढण्यात आली. पालखी रामकुंडावर आल्यावर रामकुंडात महादेवाच्या मुखवट्याला स्नान घालण्यात आले. त्यानंतर रात्री महाआरती करण्यात आली.

तिसरा श्रावणी सोमवार असल्याने भाविकांची गर्दी वाढणार असल्याने दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचवटी पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस अधिकारी, महिला आणि पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांची या ठिकाणी नियुक्ती करण्यात आली होती. तसेच, रामकुंड आणि गोदाघाटाकडे येणाऱ्या रस्त्यांवर बॅरिकेड लावून वाहनांसाठी रस्ते बंद ठेवून गर्दीचे नियोजन करण्यात आले होते.






# निवडणूक आयोगाला झालंय तरी काय?

थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

राहुल गांधींनी एक 'व्यावसायिक डेटा विश्लेषण' सादर केले अन संपूर्ण देश एका नव्या चर्चेत गुरफटला. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले आणि उत्तर ज्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देऊ लागले, त्याचवेळी 'दाल मे कुछ काला है' याची जाणीव देशाला होऊ लागली. आपण निवडणूक आयोगाचे मुख्य प्रवक्ते नसून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहोत, याचा विसर त्यांना पडला असावा. देशातील विरोधी पक्षनेत्याने निवडणूक आयोगाची बोगस मतदार प्रणाली उघड केली अन देश हादरला ही वस्तुस्थिती आहे. परिपूर्ण आणि ठोस कॉर्पोरेट सादरीकरण झाल्याने देश पण अवाक झाला. राहुल गांधींनी मतदाराच्या प्रत्येक कायदेशीर पैलूचा पुरावा म्हणून तपास केला आहे. त्यात फोटो, नाव, पत्ता, वडिलांचे कींवा पतीचे नाव, मतदार कार्डचे नाव आणि इतर डेटा पॉइंट्स सखोल अभ्यासले. सध्या कोणत्याही लोकशाहीमध्ये, प्रेस, एजन्सी आणि लोकशाही मंचांनी प्रत्येक घरात जाऊन राहुल गांधींनी नमूद केलेल्या डेटा पॉइंट्सचा वापर करून वास्तव तपासायला हवे होते. पण चौकशीऐवजी राहुल गांधींनाच प्रतिज्ञापत्र देण्यास सांगण्यात आले. आज तरी राहुल गांधींवर शिव्यांचा वर्षाव होत आहे. त्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसही मागे राहिले नाही. लोकशाहीच्या मारेक ?यांकडे सध्या तरी कोणतेही शस्त्र शिल्लक राहीलेले दिसत नाही. राहुल गांधींकडून प्रतिज्ञापत्र मागून कोणीही निवडणूक आयोगाला प्रश्न विचारू शकत नाही हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे प्रश्न पडतो की, निवडणूक आयोग लोकशाही व्यवस्थेपेक्षा वर आहे का? जर निवडणूक आयोगाकडे थोडेशीही सत्य, लाज, लज्जा, शरम, विनय आणि लोकशाहीचा आदर शिल्लक राहिला असता, तर राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेनंतर लगेचच ते राहुल गांधींनी दिलेल्या भाषणापर्यंत माध्यमांसह पोहोचले असते. एका बेडरूममध्ये ८० लोक राहतात? तीन तीन राज्यांमध्ये एकच मतदार मतदान करत आहे. एका महिलेकडे एकाच नावाचे तीन मतदार कार्ड आहेत आणि तरीही राहुल गांधींकडून प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे का? पण यावेळी राहुल गांधी कोणालाही माफ करण्याच्या मनस्थितीत नाहीत. या गुन्ह्यात सहभागी असलेला निवडणूक आयोगाचा प्रत्येक गुन्हेगार घाबरला आहे, असे चित्र दिसत आहे. त्या गुन्हेगारांना हे समजले असावे की, देशद्रोहाचा परिणाम खूप वाईट आहे. असं म्हणतात की राहुल गांधींकडे या पेक्षा अधिक डेटा आहे. अजून बरेच खुलासे व्हायचे आहेत. यामुळे संपूर्ण जगात खळबळ पसरली आहे व राहुल गांधींबद्दल जगभरात चर्चा होत आहे. लोकशाही आणि अर्थव्यवस्था यांच्यात खोलवर संबंध आहे. जर आपली लोकशाही अपयशी ठरली तर भारताची अर्थव्यवस्थाही टिकणार नाही असे अनेकजण बोलून दाखवत आहे. लोकशाहीच्या नावाखाली एकाधिकारशाही राबवली जाणे म्हणजे निकोप लोकशाही नाही. देशातील सरकारबद्दल आता जे बोललं जातयं ते योग्य नाही. 'लश्कर भी तुम्हारा है, सरदार तुम्हारा है, तुम झुठ को सच लिख दो अखबार तुम्हारा है, इस दौर के फरियादी जायें तो कहा जायें, क्यूं की कानून तुम्हारा है और दरबार भी तुम्हारा है'!

भारतीय उपखंडातील कुठल्याही देशात निकोप लोकशाही रुजणे आणि टिकवणे यासाठी सगळ्यात महत्वाची आणि अनिवार्य पूर्वअट म्हणजे त्या देशाने धर्मनिरपेक्ष असणे. लोकांचे अधिकार आणि स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने अबाधित असणे, सरकार, नोकरशाही लोकांना उत्तरदायी असणे, सरकारच्या धोरणांवर लोकांनी टीका करणे, धोरणांची चिरफाड करणे, सनदशीर मार्गाने विरोध नोंदवणे आणि निष्पक्ष निवडणुकांच्या माध्यमातून सत्तांतर घडणे या गोष्टी निकोप लोकशाहीमध्ये प्राथमिक आहेत.

भारतीय उपखंडात असणारी भाषिक, भौगोलिक, सांस्कृतिक विविधता असणारा कुठलाही प्रदेश जगाच्या पाठीवर नाही, तिथे सगळ्यांना सोबत घेऊन चालण्यासाठी लोकशाही आणि म्हणून धर्मनिरपेक्ष असणे याला पर्याय नाही. कारण इथ देशाचा विशिष्ट धर्म असून उपयोग नाही. लोकशाहीच्या माध्यमातून एकाधिकारशाही कशी राबवली जाते याच उदाहरण आपल्या शेजारी बांगलादेश आणि पाकिस्तानात समोर आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्मसमभाव या तत्वांच्या विरोधात बोलणारा माणूस प्रत्यक्षात लोकशाहीच्या विरोधात बोलतो आहे आणि असा माणूस लोकशाहीचा शत्रू आहे असं खुशाल समजून चला.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तत्परतेने निवडणूक आयोगाची बाजू घेऊन प्रतिक्रिया देण्याची केविलवाणी धडपड विरोधीपक्ष नेत्यांची निरीक्षणे योग्य असल्याची सिध्द होते. जेव्हा जेव्हा विरोधीपक्ष नेता निवडणूक आयोगाच्या गलथान कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात; तेव्हा तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षातील मंत्री विद्युतवेगाने आयोगाची बाजू तावातावाने मांडताना दिसून येतात. यामागे नक्की काय काळबेरं आहे याचा विचार मतदारांनी करायला हवा. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याप्रमाणे आयोगाचा बचाव करत विरोधीपक्ष नेत्यावर वैयक्तिक टीका केली, ज्यामुळे त्यांची उद्विग्नता स्पष्ट दिसते.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे हे वर्तन त्यांच्या राजकीय हतबलतेचे द्योतक दिसते. निवडणूक आयोगानेही विरोधीपक्ष नेत्याच्या आरोपांना बेजबाबदार ठरवत चचेर्चे आमंत्रण दिले, पण विरोधीपक्ष नेत्याने सादर केलेल्या ठोस पुराव्यांचे खंडन करण्यात आयोग सपशेल अपयशी ठरलाय. विरोधीपक्ष नेत्याच्या या विश्लेषणाने व पुराव्यांनी निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर आणि सत्ताधाऱ्यांच्या विजयाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. विरोधीपक्ष नेत्याने पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र, हरियाणा व कर्नाटक राज्यातील निवडणूकांमध्ये बोगस मतदानाच्या आधारे आता सत्तेवर असलेल्या पक्षाला निवडणूक जिंकता येते याची कार्यपद्धती दाखवून दिली आहे.

विरोधी पक्षनेत्याने सादर केलेल्या पुराव्यांनुसार, मतदार यादीद्वारे पाच प्रकारच्या मतांच्या चोरीची पोलखोल केली आहे. त्यानुसार बोगस दुबार मतदार, खोटे आणि अवैध पत्ते असलेले मतदार, एकाच पत्त्यावर अनेक मतदार, अवैध किंवा फोटो नसलेले मतदार, फॉर्म क्रमांक ६ चा गैरवापर करुन नोंदणी केलेले नवीन मतदार यांची पोलखोल निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादीचे विश्लेषण करुन केली आहे. कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघाचे अशाप्रकारे विश्लेषण केल्यानंतर एकूण १,००,२५० मतदारांचा बोगसपणा उघड झाला.

निवडणूक आयोगाने राहुल गांधींना कर्नाटकातील त्या बनावट मतांच्या आरोपांवर शपथपत्र सादर करण्यास किंवा माफी मागण्यास सांगितले. राहुल गांधींनी हा आरोप बंगलोर सेंट्रल मतदारसंघातील महादेवपूरा विधानसभा क्षेत्राबाबत केला होता. आयोगाने स्पष्ट केले की, आरोप खरे असतील तर पुरावे द्यावेत, अन्यथा माफी मागावी. राहुल गांधींनी प्रत्युत्तरात निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत इलेक्ट्रॉनिक मतदार यादीची मागणी केली.

महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदार यादी पारदर्शकपणे तयार केल्याचे आणि काँग्रेसला ती वेळेत दिल्याचे सांगितले. निवडणूक आयोगाने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना कर्नाटक आणि महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या निवेदनावर सही करण्यास किंवा त्यांच्या निराधार आरोपांसाठी देशाची माफी मागण्यास सांगितले आहे.

कर्नाटक आणि महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांना पत्र लिहून शपथपत्र सादर करण्यास आणि विशिष्ट पुरावे देण्यास सांगितले आहे. निवडणूक आयोगाने राहूल गांधींकडे शपथपत्र मागितले आहे, पण त्यांनी संसदेत संविधानावर हात ठेवून शपथ घेतली आहे.

ते म्हणाले, जेव्हा जनता आमच्या डेट्याबाबत प्रश्न विचारते, तेव्हा निवडणूक आयोगाने राजस्थान आणि बिहारमधील वेबसाइट बंद केली आहे. कारण त्यांना माहिती आहे की, जनतेने डेट्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली तर त्यांची पोल उघड होईल.

राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला इलेक्ट्रॉनिक मतदार यादी देण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले, मी काल सिद्ध केले आहे की देशात मतांची चोरी झाली आहे. जर निवडणूक आयोगाने आम्हाला इलेक्ट्रॉनिक मतदार यादी दिली, तर आम्ही सिद्ध करू की पंतप्रधान मत चोरी करून पंतप्रधान झाले. राहुल गांधी यांच्या आरोपांमुळे निवडणूक आयोग आणि काँग्रेसमधील तणाव वाढला आहे.

आयोगाने गांधी यांना पुरावे सादर करण्याचे आव्हान दिले आहे, तर गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. हा वाद पुढे काय वळण घेईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संसदेत भाषण करताना चारच दिवसापूर्वी मोदी राहुलकडे पाहात चेष्टायुक्त स्वरात म्हणाले होते की, या लोकांना जनता वारंवार का नाकारतेय ते त्यांना अजून का लक्षात येत नाही? तर त्याच्या आदल्या दिवशी नासक्या सुरात राहुल गांधींना उद्देशून म्हणत होते की, २०२९ साली देखील तुम्ही त्याच म्हणजे विरोधी बाकावर बसणार आहात. सत्तेतून आलेला हा उद्दामपणा कशाच्या जोरावर होता, तर चालविलेल्या अखंड मत चोरीच्या जोरावर ना? त्याची पोलखोल राहूल गांधींनी नुकतीच जगासमोर केलीय.

भक्कम संघटन, कुणाची तरी चाणक्यगिरी, मोदींची लोकप्रियता, आरएसएसचा सक्रिय पाठिंबा, कार्यकर्त्यांची मेहनत, लोकांची केलेली कामे म्हणजे विकास, जगात वाढलेली प्रतिष्ठा या सगळ्यातील फोलपणा नुकताच नागडा झांला. भाजपला गेली अकरा वर्ष मिळालेला पाठिंबा हा लोकप्रेमातून मिळत नव्हता, तर तो मतांच्या चोरीतून मिळवला जात होता, हे राहूल गांधींनी उघडं केलंय.

या मतचोरीची तयारी भाजपने फार अगोदरपासून चालवली होती. त्यासाठी त्यांना 'असोशिएशन ऑफ बिलियन माईंड्स' ही कंपनी मदत करत होती. गुगलवर तिची कुंडली लोकांनी शोधली. भाजपसाठी फर्जी मतदार तयार करणाऱ्या या कपंनीची दिल्ली, गुजरात आणि हैद्राबाद येथे कार्यालये आहेत. कंपनीने तयार केलेल्या बोगस मतदार यादीवर निवडणूक आयोगाचे अधिकारी मान्यतेची मोहोर तात्काळ उमटवीत असायचे. हेच भाजपच्या यशाचे गमक समजता येईल.

ममता बॅनर्जींनी ती चोरी पकडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा कंपनी सावध झाली, पण भाजपसाठी काम करत राहिली. गेली अकरा वर्ष या कंपनीने भारतीय निवडणूक ही चेष्टेचा विषय बनविलाय, ही गंभीर बाब आहे. या मतचोरीच्या घटनेत नैतिकता आणि देशप्रेमाचे डोस लोकांना वारंवार पाजणाऱ्या पाखण्डी देशभक्तांचेही पूर्ण वस्त्रहरण झालंय. सामान्य जनता आपल्याला जवळ करत नाही, हे लक्षात आल्यावर येन केन प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याचा हा प्रकार दिसतो. त्यासाठी त्यांना आपली माणसे सर्व मोक्याच्या जागी हवीत. शिवाय सत्ता देखील सुशेगात राहायला हवी.

मग देशभर हिंदू -मुसलमान, मशीद-मंदिराचा हमखास ध्रुवीकरण करणारा अजेंडा त्यांनी इमाने इतबारे चालवला आणि त्या आवरणाखाली मतांची चोरीदेखील लपवली जात होती. राहुल गांधींनी जणू बॉम्ब फोडलाय आणि एका अर्थी संविधानाचा गळा मोकळा केलाय.

दिल्ली निवडणुकीपूर्वी हाच मतदारयादीचा घोटाळा आम आदमी पार्टीने पुराव्यानिशी उघडा पाडला होता. पण त्यावेळी राहूल गांधी शांत होते. तेव्हाही काही झाले नाही, आत्ताही काही होणार नाही असा सर्वांचा समज होता. करंटेपणा व बालिशपणा सोडून आणि दम असेल तर राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर दिले पाहिजे.

## भारत खरोखरचं बांगलादेशच्या मार्गावर चालला?

संसदेत मोदी व भाजप सरकारने सांगितलेलं आहे, निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नांना, आक्षेपांना उत्तर देणे सरकारचे काम नाही. सबब आम्ही उत्तर देणार नाही. पण निवडणूक आयोगाची अवस्थाच पुराणातल्या शकुंतलेसारखी झालेली आहे. राहुल गांधींच्या एका पत्रकार परिषदेत केलेल्या खुलाशानंतर मतदार यादीतील झोल झाल्याचं ऐकून लोकांची उत्सुकता ही शिगेला पोहचली होती. यांचाच परिपाक पाहून निवडणूक आयोगाने बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी राज्यांच्या याद्या आता वेबसाइटवरून काढून टाकल्या आहेत. भारत आता बांगलादेशच्या मार्गावर चालत असल्याचे दिसून येत आहे. जिथे शेख हसीना निवडणूक जिंकत होत्या, पण लोकांचा विश्वास संपुर्ण गमावला. भारतात, निवडणूक आयोग आणि सरकारवरील लोकांचा विश्वास कमी होऊ लागला आहे. चोरी पकडून दिल्यावर आधी शपथपत्र द्या असं आयोगानं म्हणणं हा अति उच्च दर्जाचा बेशरमपणा आहे. आयोगाचे आयुक्त आणि अधिकारी लोकांच्या करातून पगार घेतात, मोदी शहांच्या खाजगी जायदादीतून नाही. आयोग आम्हाला म्हणजे सामान्य माणसांना म्हणजेच 'लुई दी पिपल्स ऑफ इंडिया'ला उत्तरदायी आहे. कारण तो आमचा म्हणजे भारतीय नागरिकांचा नोकर आहे. नोकरानं दुसऱ्या वरिष्ठ नोकरांच्या जीवावर मूळ मालकाशी उद्धट वागू नये हा नियम आहे. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता संपली आहे. म्हणून त्यानं उत्तर देण्याआधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एक मंत्री आशिष शेलार आयोगाची प्रवक्तेगिरी करत आहेत. भाजपाचे नेते का स्पष्टीकरण देत आहेत? लोकांना सगळं कळतंय. लोक स्वतःच उपाययोजना करतील. भारतीय माणूस सहनशील असतो. शंभर अपराध भरल्याशिवाय सुदर्शन चक्र उचलत नाही. उचलतो त्यादिवशी इंदिरा गांधींना राजनारायण नावाचा विदूषकही हरवून टाकतो. तो दिवस येणं अटळ आहे. तोपर्यंत भाजपवाल्यांनी धिंगाणा करून घ्यावा. लोकांनाही बहुमत देण्याची किंमत कळली पाहिजे.

# वादग्रस्त चित्रपटांवर बंदी हवीच!

वाद निर्माण होतील असे चित्रपट बनवायचे म्हणजे त्याविषयी समाजात मोठ्या प्रमाणात चर्चा होते, त्याचा निषेध केला जातो, त्यासाठी आंदोलने उभारली जातात, वृत्तवाहिन्यांवर त्याबाबत चर्चासत्रे भरवली जातात आणि या सर्वांतून चित्रपटाला फुकटची प्रसिद्धी मिळते आणि लोकं चित्रपटात नेमकं आहे तरी काय हे पाहण्यासाठी चित्रपट गृहाच्या बाहेर गर्दी करतात.

अशा प्रकारचे फॅड गेल्या काही वर्षांपासून निर्माण झाले आहे. 'खालिद का शिवाजी' हा सुद्धा त्यापैकीच एक चित्रपट. आज या चित्रपटाला समाजातून मोठ्या प्रमाणात विरोध होताना दिसत आहे. या चित्रपटाद्वारे इतिहासाचे विकृतीकरण केले गेल्याचा आरोप या चित्रपटावर होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाचा सोळाव्या वर्षी रायरेश्वराला स्मरून हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. पाच यवनी पातशाह्यांना त्यांनी नेस्तनाबूत केले.

या सर्वांत त्यांना साथ लाभली ती देव, देश आणि धमार्सा़ठी प्रसंगी प्राण अर्पण करणाऱ्या स्वराज्यनिष्ठ मावळ्यांची. 'आधी लगीन कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे' अशी प्रतिज्ञा घेणारे तानाजी मालुसरे, 'शत्रूस धुळीस मिळवल्याशिवाय राजे तुम्हाला तोंड दाखवणार नाही' असा पन करून हजारो यवनी सैनिकांवर तुटून पडलेले स्वराज्याचे सात शिलेदार, 'राजे तुम्ही गडावर पोहोचल्याशिवाय हा बाजी प्राणही त्यागणार नाही' असे आश्वासन देणारे बाजीप्रभू देशपांडे, यांसारख्या अनेक पराक्रमी मावळ्यांच्या कथा इतिहासाच्या पुस्तकातून वाचून आपण सर्वच जण लहानाचे मोठे झाले आहोत.

शालेय अभ्यासक्रमाच्या कोणत्याही पुस्तकात शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५ टक्के मुस्लिम होते आणि महाराजांचे ११ अंगरक्षक मुस्लिम होते असे आजतगायात शिकवण्यात आलेले नाही. मग या चित्रपटासाठी हा शोध कुठून लागला? असा प्रश्न यानिमित्ताने हिंदुत्ववादी संघटनांकडून विचारला जात आहे.

महाराजांनी रायगडावर मशिद उभारल्याचा दाखल कोणत्याही ऐतिहासिक दस्तावेजात नाही मग या चित्रपटात या बाबी घुसवून महाराजांना हेतुपुरस्सर पंथनिरपेक्ष ठरवण्याचा प्रयत्न का केला जात आहे असाही सवाल केला जात आहे. उलट शिवकालीन पत्रांमध्ये महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी परकीय आक्रमकांशी कोणतीही तडजोड केली नाही, याचे स्पष्ट उल्लेख आढळतात. त्यामुळे इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्या या चित्रपवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी हिंदुत्ववाद्यांकडून केली जात आहे.

जर मुस्लिम समाजाला खरेच छत्रपती शिवाजी महाराजांविषयी प्रेम असते, तर पाच मुसलमान पातशाह्यांनी त्यांना संपवण्याचा चंग बांधला नसता किंवा छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले नसते.

सध्याच्या काळातही जर मुसलमान समाजाला शिवाजी महाराजांप्रती आदर असता, तर यवत (ता. दौंड, जि. पुणे) येथे झालेल्या हिंसाचारात सय्यद नावाच्या धर्मांध व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती फोडली नसती. त्यामुळे खालिद का शिवाजी हा चित्रपट हिंदू समाजात भ्रम निर्माण करणारा आणि शिवाजी महाराजांचे खोटे चित्रण करणारा आहे, असा आरोप हिंदू जनजागृती समितीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला असून या चित्रपटाच्या विरोधात जन आंदोलन छेडले आहे.

ज्याप्रमाणे उदयपूर फाइल्स : कन्हैय्यालाल टेलर मर्डर या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यावर अंतरिम बंदी आणण्यात आली, त्याचप्रमाणे खालिद का शिवाजी या चित्रपटामुळे दुखावलेल्या शिवप्रेमी जनतेच्या भावनांची दखल घेऊन या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी अशी मागणी समितीने केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी तत्कालीन सर्वच पंथियांचा आदर केला आहे, याचा अर्थ ते पंथनिरपेक्ष होते असा होत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी मुस्लिम समाजाला एव्हढाच आदर आहे तर वर्षातून दोन वेळा राज्यासह देशभरात साजरे होणारे शिवजयंती महोत्सव किती मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये साजरे केले जातात? किती मुस्लिमांच्या घरात शिवरायांच्या तसबिरी किंवा मूर्ती आहेत असाही सवाल यानिमित्ताने हिंदुत्ववाद्यांकडून विचारला जात आहे.

त्यामुळे लोकभावनांची वेळीच दखल घेऊन खालिद का शिवाजी या चित्रपटावर सरकारने बंदी आणावी आणि शिवप्रेमीना आश्वस्त करावे अशी मागणी एकमुखाने होत आहे!


जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## चोरट्यांनी हॉटेलमधून मोर कुठून आणि का चोरले?




अमेरिकेतील उत्तर कॅलिफोर्नियामधील एका जुन्या हॉटेलमधून डझनभर मोर आणि मोर गायब झाले आहेत. एका मोराची किंमत सुमारे १.६ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. हॉटेल कर्मचाऱ्यांचा असा विश्वास आहे की ते चोरीला गेले आहेत. हॉटेलचे जनरल मॅनेजर डेव्हिड निल्सन म्हणाले की, एका ग्राहकाने दोन लोकांना पिकअप ट्रकच्या पिंजऱ्यात मोर ठेवताना पाहिले. मोजणी केल्यावर असे आढळून आले की आता फक्त चार मोर उरले आहेत. हे मोर १४ वर्षांपूर्वी खरेदी केले होते आणि आता एकूण १५ मोर होते, जे हॉटेलची ओळख बनले होते, ज्यांना कर्मचारी पाळीव प्राणी म्हणून पाळत असत.

पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. हॉटेलने पाळत वाढवली आहे आणि कुंपण घालण्याचीही योजना आखत आहे. कर्मचाऱ्यांना आशा आहे की त्यांचे लाडके मोर सापडतील.

## चैतन्याचा स्त्रोत मंदिरे

वाचक लिहितात

भारतीय संस्कृतीत मंदिरांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. पूर्वी मंदिरे चैतन्याचे स्त्रोत तर होतीच शिवाय स्थानिकांच्या चारिताथार्चा भारही मंदिरे उचलत होती. प्रत्येक मंदिराच्या ठिकाणी पूर्वी गोशाळा, गुरुकुल, वेदपाठ शाळा, धर्मशाळा अशी परिपूर्ण विकास रचना होती त्यातून नीती आणि नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनशैलीचे आणि धर्माचरणाचे शिक्षण दिले जात असे. पंथनिरपेक्षव्यवस्थेमुळे आज ही स्थिती राहिलेली नाही. मंदिर अधिग्रहण कायदा करून सरकारने देशातील अनेक प्राचिन मंदिरे आपल्या ताब्यात घेऊन त्यावर सरकारी समित्या नेमल्या आहेत.

सश्रद्ध भाविकांकडून देवतांच्या चरणी श्रद्धेने अर्पण केलेल्या धनाचा वापर शासकीय योजनांसाठी आणि अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी हवा तसा वापरला जात आहे. मंदिरावर नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांकडून अनेक ठिकाणी आर्थिक गैरव्यवहार केले गेल्याचीही प्रकरणे उजेडात आली आहेत. हिंदूंनी मंदिरात अर्पण केलेल्या धनाचा वापर खरेतर मंदिराच्या विकासासाठी, धार्मिक विधींसाठी, गोशाळा, गुरुकुल चालवण्यासाठी व्हायला हवा. मात्र असे काही घडताना दिसत नाही. देवधनाकडे सरकारी धन म्हणून पाहिले जात आहे. आश्चर्यांची गोष्ट म्हणजे हे केवळ हिंदूंच्या मंदिरांबाबतचे घडत आहे. आजमितीला देशातील अन्य पंथीयांचे कोणतेही प्रार्थनास्थळ किंवा धार्मिक ठिकाण यांवर सरकारी नियंत्रण नाही. उत्तर भारतातील अनेक मंदिरे आज विकसित करण्यात आली आहेत, त्या ठिकाणी लोकांना पाहण्यासाठी विविध प्रकारची दालने उभारण्यात आली आहेत, भक्तांच्या निवासासाठी आकर्षक इमारती उभारण्यात आल्या आहेत. याठिकाणी हिंदूंना धर्मशिक्षण देण्याची कोणतीच व्यवस्था करण्यात आलेली नाही परिणामी प्राचीन मंदिरे आता पर्यटकांची आकर्षण केंद्रे बनली आहेत.

मंदिरांचा विकास करून त्यांकडे राज्याला निधी मिळवून देणारे साधन म्हणून पाहिले जात आहे. समाजाचे दिवसागणिक होत असलेले नैतिक अधःपतन, वाढती गुन्हेगारी, स्त्रियांवरील अत्याचार, गल्लीपासून दिल्लीपर्यंत बोकाळलेला भ्रष्टाचार, नात्यांमधील दुरावा या सर्वांवर उपाय म्हणून समाजात आज नैतिक मूल्ये रुजवणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी मंदिरे भक्तांच्या ताब्यात देऊन प्रत्येक प्राचीन मंदिरांतून गुरुकुल चालवले जावेत.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

## रोज सकाळी रिकाम्या पोटी खा अद्रक आणि मध



सध्या पावसाळा सुरू आहे. या ऋतूमध्ये अनेक हंगामी आजार होण्याची शक्यता असते. तर या दिवसांमध्ये आरोग्याची अतिरिक्त काळजी घेण्याची गरज आहे. यासाठी आहारात अशा गोष्टींचा समावेश करणे उचित आहे जे आरोग्यासाठी फायदेशीर आहेत आणि त्यांचे सेवन केल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते.

अदरक आणि मध हे शतकानुशतके अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरले जात आहे. आयुवेर्दातही यांचा वापर मोठ्याप्रमाणावर होत असतो. तसेच रोज स्वयंपाक करताना अदरकचा वापर केला जातो. कारण अदरकमध्ये असलेले जिंजरॉल नावाचे संयुग आणि मधात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स शरीराला अनेक आजारांपासून वाचवण्यास मदत करतात.

**पचन सुधारते** : अदरक आणि मध एकत्र खाल्लयाने पचनसंस्था मजबूत होते. मधामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म पचन सुधारण्याचे काम करतात. तुम्ही जर दररोज त्यांचे सेवन केले तर बद्धकोष्ठता, आम्लता आणि पोटफुगी यासारख्या समस्यांपासून आराम मिळू शकतो.

**सर्दी आणि खोकल्यापासून आराम** : पावसाळ्यात सर्दी आणि खोकल्यासारख्या समस्यां सारख्या सतावत असतात. अदरकच्या रसात मध टाकून सेवन केल्यास लगेच आराम मिळू शकतो. आल्यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म घशाची जळजळ कमी करतात. याशिवाय, मध घशातील जळजळ कमी करते. यामुळे खोकल्याच्या समस्येपासून आराम मिळतो.

**दम्यामध्ये फायदेशीर** : अदरक आणि मध हे दम्याचा त्रास असलेल्या लोकांसाठी देखील फायदेशीर मानले जातात. ते दम्याला चालना देण्यास प्रतिबंध करते. याशिवाय फुफ्फुसांच्या संसगार्चा धोका कमी करते. दिवसातून तीन वेळा अदरक आणि मधाचे सेवन करू शकता.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते** : हंगामी आजारांपासून बचाव करण्यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती असणे खूप महत्वाचे आहे. अशावेळेस अदरक आणि मध खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढवता येते. अदरक आणि मध रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी काम करतात.

**वजन कमी होते** : पावसाळ्यात अदरक आणि मधाचे सेवन करून तुम्ही तुमचे वजन नियंत्रित ठेवू शकता.

आल्याच्या रसात मध मिक्स करून त्याचे सेवन करावे लागेल. तुम्ही ते सकाळी रिकाम्या पोटी देखील घेऊ शकता.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)


### पटलं तर घ्या!

दिनचर्या आहे व्यस्त
लोक आहेत त्रस्त
शार्ट बट स्विट मॅसेज
पाठविणेच आहे रास्त..!

गृप झालेत भक्कम
वेळेचा आहे वाणवा
पॉईंटेड लीखानाची
अंगी सवय बानवा ..!

वाचन मनन चिंतन
निरीक्षण जो करते
त्याच्याच लेखणीतून
अंतरीचे बोल प्रसवते!

# सेवानिवृत्त तीन शिक्षकांना 15 वर्षांनी मिळाला न्याय

## महापालिकेला ठोठावला दंड

**भाईंदर, दि. ११ : प्रतिनिधी**

झुंज जनरल कामगार संघटनेच्या प्रयत्नांमुळे मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील तीन बालवाडी शिक्षकांचा १५ वर्षांपासून प्रलंबित भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि दोन्ही बाजूंकडून (कर्मचारी आणि मालक) संपूर्ण भरपाईची रक्कम अखेर मिळाली आहे. संघाचे अध्यक्ष आणि भाजप कामगार आघाडी मुंबई राज्य सरचिटणीस डॉ. अमित भोसले यांच्या नेतृत्वाखाली लढण्यात आलेला हा लढा यशस्वी झाला आहे. तीन शिक्षक १५ वर्षांपासून मीरा-भाईंदर महानगरपालिकेत एकरकमी देयक प्रणालीवर काम करत होते. तीन शिक्षिकांपैकी मंदाकिनी रूपवते यांचे निवृत्तीनंतर निधन झाले. परंतु डॉ. अमित भोसले आणि त्यांच्या संस्थेच्या मदतीने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाही पूर्ण लाभ मिळवून देण्यात आले. हे काम केवळ थकीत पीएफ वसूल करण्यापुरते मर्यादित राहिले नाही, तर शिक्षकांना देय असलेल्या रकमेसह दुप्पट भरपाई देखील देण्यात आली आहे.या संपूर्ण प्रकरणात वसूल केलेली एकूण रक्कम १६ लाख रुपयांपर्यंत आहे, जी संबंधित शिक्षकांच्या आणि त्यांच्या वारसांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महानगरपालिकेच्या या शिक्षकांचा पीएफ विभागात जमा केला जात नव्हता. परंतु या संदर्भात कोणतीही तक्रार किंवा कारवाई करण्यात आली नाही. झुंज जनरल वर्कर्स युनियनने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आणि कायदेशीर पातळीवर लढा दिला, ज्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना आणि महानगरपालिकेला दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले. भविष्य निर्वाह निधी (पीएफ) न दिल्याबद्दल महानगरपालिकेला दंड आकारण्याची ही राज्यातील पहिलीच घटना आहे. कामगारांच्या हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी या निर्णयाने राज्यातील इतर नगरपालिकांसाठी एक नवीन आदर्श निर्माण केला आहे.

# कऱ्हाड उत्तरच्या काँग्रेसचा 'करेक्ट कार्यक्रम'

## भाजपच्या मोर्चात बालेकिल्ल्याची मोडतोड!

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

कऱ्हाड उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा गड कापसासारखा उडाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. कोपर्डे हवेली जिल्हा परिषद गट, जो वर्षानुवर्षे काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता, तिथे भाजपने थेट शिरकाव करत नेते-कार्यकर्त्यांना आपल्या गळाला लावले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या ‘ऑपरेशन’ला भाजपने अगदी शिताफीने ‘करेक्ट कार्यक्रम’ असे नाव मिळालं आहे.

**बालेकिल्ल्यात भगवा झेंडा**

गेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसचे निवास थोरात यांच्यासारखे नेते सहज निवडून येत असलेला कोपर्डे हवेली गट आता भाजपच्या ताब्यात जाणार, हे कुणालाही कल्पनाही नव्हते. मात्र, विधानसभा पातळीवर मनोज घोरपडे आणि डॉ. अतुल भोसले यांच्या विजयाने भाजपचा आत्मविश्वास वाढला. याच दरम्यान, काँग्रेसमध्ये सक्षम नेतृत्वाच्या अभावाने कार्यकर्त्यांची नाराजी ओसंडून वाहत होती.

**भाजपचे 'सर्जिकल स्ट्राइक'**

भाजपचे धैर्यशील कदम, रामकृष्ण वेताळ यांनी थेट गडात घुसून काँग्रेसच्या नेत्यांना विश्वासात घेतलं. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या उपस्थितीत काँग्रेसमधील अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हा कार्यक्रम म्हणजे काँग्रेसच्या राजकीय नकाशावर मोठी भोकं पडल्यासारखा होता.

**अनुपस्थितीची कुजबुज**

या पक्षप्रवेश सोहळ्यात एक गोष्ट मात्र सगळ्यांच्या लक्षात आली . कऱ्हाड उत्तरचे भाजप आमदार मनोज घोरपडे गैरहजर होते! त्यांच्या अनुपस्थितीमागे काय राजकीय समीकरणं आहेत, यावर गावोगावी चर्चा रंगू लागली आहे.

**राष्ट्रवादीची पलटवार तयारी**

दरम्यान, माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानेही भाजपला उत्तर देण्यासाठी रणनीती आखली आहे. सह्याद्री साखर कारखान्याच्या निवडणुकीतील विजयाने त्यांचा गट चार्ज झाला आहे आणि भाजपच्या फोडाफोडीला थोपवण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे.

**उंडाळकर गटाचा अजितदादांकडे झुकाव**

माजी मंत्री (कै.) विलासराव पाटील-उंडाळकर यांचा उत्तरेतला मजबूत गट त्यांच्या सुपुत्र ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झाला आहे. यामुळे काँग्रेसला दुहेरी फटका बसला आहे – एकीकडे भाजपची घुसखोरी, तर दुसरीकडे उंडाळकर गटाची हानी. कऱ्हाड उत्तरचा हा राजकीय भूचाल पुढे कोणत्या दिशेने वळतो, हे पाहणं आता सगळ्यांसाठीच उत्सुकतेचं कारण ठरत आहे.

# वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी मुंबई विभागीय निवड चाचणी 13 ऑगस्ट रोजी

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघ (आयएसएफ) आयोजित वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल (अंडर-15 बॉईज व गर्ल्स) चॅम्पियनशिप ४ ते १३ डिसेंबर २०२५ दरम्यान शांग्लूओ, चीन येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राज्यस्तरावरील निवडीसाठी मुंबई विभागीय निवड चाचणी १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता नेरूळ जिमखाना, नेरूळ, नवी मुंबई येथे होणार असल्याची माहिती मुंबई विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक यांनी दिली आहे.

चीन येथे होणाऱ्या स्पर्धेत सहभागासाठी भारतीय संघाच्या निवडीसाठी राष्ट्रीय पातळीवरील निवड चाचणी २५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत पुण्यातील श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी येथे घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई विभागासाठी निवड चाचणी नेरूळ जिमखाना येथे आयोजित करण्यात आली आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांतील १५ वर्षांखालील पात्र मुले व मुली या चाचणीत सहभागी होऊ शकतील. या निवडीतून विभागातील सर्वोत्तम पाच मुले व पाच मुली यांची निवड राज्यस्तरासाठी केली जाईल. यासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१० नंतर आणि १ जानेवारी २०१४ पूर्वी झालेला असावा.

तसेच, इंग्रजीतील मूळ जन्म दाखला अनिवार्य असणार आहे. राष्ट्रीय चाचणीवेळी किमान सहा महिन्यांची वैधता असलेला भारतीय पासपोर्ट आवश्यक; विभागीय चाचणीवेळी पासपोर्ट अर्जाचा पुरावा सादर करणे आवश्यक. आधार कार्ड आवश्यक, पहिल्या इयत्तेच्या प्रवेशाची शाळेच्या जनरल रजिस्टरमधील नोंदणीची सत्यप्रत आवश्यक, भोजन व्यवस्था खेळाडू किंवा संबंधित शाळेने स्वतः करावी असेही विभागीय उपसंचालक कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## रक्षाबंधन निमित्त द चिल्ड्रन एड संस्थेस महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांची भेट

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

अनेक दशकांपासून बालकल्याणासाठी समर्पित असलेल्या माटुंगा येथील द चिल्ड्रन एड संस्थेस महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी भेट देत पाहणी करून कामकाजाची माहिती जाणून घेतली. यावेळी संस्थेतील मुलांसोबत संवाद साधत त्यांच्या सहवासात रक्षाबंधन साजरी करण्याचा विशेष आनंद लाभला असल्याच्या भावना मंत्री तटकरे यांनी यावेळी व्यक्त केल्या. अनेक वर्षापासून कार्यरत असलेली ही संस्था बालकांना शिक्षण, कला, नृत्य आणि विविध उपक्रमाद्वारे प्रगतीची संधी उपलब्ध करून देत आहे. तसेच विविध सुविधांसह बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत असल्याचे अनुभवायला मिळाले असल्याचेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी त्यांनी मुलांना राख्या बांधल्या, मुलांशी संवाद साधला, मुलांनी बनविलेल्या विविध वस्तुंचे कौतुक केले. माटुंगा येथे असलेल्या द चिल्ड्रन एड संस्थेत मुलांना औपचारिक शिक्षण, तसेच एसएससीनंतरचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते.

## महापारेषणच्या वीज वाहिनीतील बिघाडाचा फटका महावितरणच्या ग्राहकांना

**कल्याण, दि. ११ : प्रतिनिधी**

महापारेषणच्या पडघा- मोहने १०० के.व्ही. या वीज वाहिनीत सोमवार दिनांक ११.०० रोजी सकाळी १०.३० च्या दरम्यान बिघाड झाल्याने महावितरणच्या सुमारे एक लाख वीज ग्राहकांना आठ तास भार व्यवस्थापन सहन करावे लागले. महापारेषणच्या पडघा- मोहने वीज वाहिनीच्या मनोऱ्यातील तार गाळेगाव परिसरात अचानक तुटून पडली. परिणामी महावितरणच्या बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर येथील एक लाख वीज ग्राहकांना याचा फटका बसला. अचानक वीज पुरवठा खंडित झाल्याने महावितरणच्या यंत्रणेवर ताण आला. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. परिणामी बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर या परिसरात महावितरणला सकाळी ११.०० पासून भार व्यवस्थापन करावे लागले.

अखेर संध्याकाळी ६.१५ च्या दरम्यान महापारेषणचा वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर महावितरणकडून अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर येथील वीज ग्राहकांना टप्पाटप्याने वीजपुरवठा करण्यात आला.

# ‘आपलं मंत्रालय’ विशेषांकाचे प्रकाशन

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

शासन, समाज आणि व्यक्ती यांच्यातील सुसंवाद दृढ करण्यासाठी तसेच विचारप्रवृत्त व माहितीपूर्ण लेखन वाचकांसमोर आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या "आपलं मंत्रालय" या गृहपत्रिकेचा विशेषांक मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

या प्रकाशन सोहळ्यास सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विशेषांकात "भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास", "शालेय शिक्षण विभाग व माननीय न्यायालय यांचा परस्पर संबंध" यांसारखे सखोल व ज्ञानवर्धक लेख समाविष्ट आहेत. शासनाच्या कार्याचे संवेदनशील व मानवी रूप वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सकारात्मक संवादाची नवी दिशा देण्याचा प्रयत्न या अंकातून करण्यात आला आहे.

"आपलं मंत्रालय" या उपक्रमातून वाचक, समाज आणि शासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व बळकट होईल, असा विश्वास डॉ. कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

हा विशेषांक https://publuu.com/flip-book/945595/2075357 या लिंकवर वाचनासाठी मोफत उपलब्ध आहे.

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाचे पाच नवीन विक्रम; एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

शून्य विद्युत अपघातासाठी जनजागृती अभियानातील विविध उपक्रमांत लोकसहभागाचे महावितरणने नवीन पाच विक्रम नोंदवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या दोन्ही संस्थांच्या वतीने सोमवारी (दि. ११) पाचही विक्रमाच्या नोंदीचे प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या संकल्पनेतून विद्युत सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातील लोकसहभागाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतल्याबद्दल त्यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा मयंक शाह यांनी विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांची घोषणा केली. त्यांनी या दोन्ही संस्थांच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत (मानव संसाधन), श्री. प्रसाद रेशमे (प्रकल्प), सौ. स्वाती व्यवहारे (वित्त) यांना प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा सन्मान केला. यावेळी एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा शाह यांनी महावितरणच्या पाचही विक्रमांची माहिती दिली. संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले, की ‘लोकसहभागातून शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या अभियानाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल.’



महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते यात सुरक्षा संदेश देणाऱ्या मॅरॅथॉनमध्ये ११ हजार ८८१, ऑनलाइन प्रश्नमंजूषेत ९६ हजार १५०, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धेत ७ हजार ५९३, विद्युत सुरक्षेच्या रॅलीमध्ये २७ हजार १५५ जण सहभागी झाले होते. तसेच दि. ६ जूनला एकाचवेळी ४२ हजार २०१ जणांनी विद्युत सुरक्षेची शपथ घेतली. यासह महावितरणकडून १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर ‘एसएमएस’द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या सर्व उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

भारत सरकारकडे नोंदणीकृत व वर्ल्ड रेकॉर्ड युनिव्हर्सिटीशी संलग्न एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आशियातील सर्व प्रमुख राष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड्सचे परीक्षण करून नोंदी घेतल्या जातात. त्यानुसार महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानामध्ये प्रामुख्याने विद्युत सुरक्षा रॅली, मॅरॅथॉन, विद्युत सुरक्षेची शपथ, ऑनलाइन प्रश्नमंजूषा तसेच ‘एसएमएस’ व ‘इमेल’द्वारे ग्राहक संवादामध्ये लोकसहभागाच्या विक्रमांची नोंद केली. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. त्यानंतर या नोंदी एशिया बुक ऑफ रेकॉर्डकडे पाठविण्यात आल्या. त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्रोटोकॉलनुसार परीक्षण झाल्यानंतर या विक्रमांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

कार्यक्रमात कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत यांनी अभियानाची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमाला मुख्य अभियंते सर्वश्री मनीष वाठ, दत्तात्रेय बनसोडे, प्रशांत दानोळीकर, हरिश गजबे, वादिराज जहागिरदार, दीपक कुमठेकर, मिलिंद दिग्रसकर, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके आदींची उपस्थिती होती.


## आज का अंदाज

मंगळवार १२ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| ३४६ | १६१ | ४४९ | २३५ | ७८९ | १५९ | १३४ | ११९ |
| ४९० | ३४९ | ३४० | ३७० | ४४६ | २६७ | २७९ | ३६० |
| ५८० | २६८ | ८९० | ४६० | १४१ | ७८० | ३६९ | ५६८ |
| ३४ | ६४ | ७५ | ०५ | ४३ | ५३ | ८१ | ९१ |
| ३८ | ६८ | ७९ | ०९ | ४६ | ५६ | ८२ | ९२ |
| ३२ | ६२ | ७१ | ०७ | ४७ | ५६ | ८० | ९० |

**१२ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५३ | ८३ |
| १९ | २९ | ५७ | ८७ |
| १६ | २६ | ५४ | ८५ |
| ११९ | ६८८ | १५९ | २६० |
| २२७ | ३९० | २६७ | ४५९ |
| ३४४ | ५८९ | ७८० | ११६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# बीएलएस पॉलिमर्स लिमिटेडने सेबीकडे डीआरएचपी दाखल

**मुंबई, ११ ऑगस्ट:** बीएलएस पॉलिमर्स लिमिटेड ही विविध ग्रेड्समधील ग्राहकांच्या गरजेनुसार तयार केलेल्या पॉलिमर कंपाऊंड्सची निर्माती कंपनी असून दूरसंचार, वीज, रेल्वे, पाणीपुरवठा, तेल आणि वायू वितरण यांसारख्या महत्त्वाच्या विविध क्षेत्रांना पुरवठा करते. कंपनीने भांडवली बाजार नियंत्रक भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाकडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

कंपनी प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीद्वारे इक्विटी शेअर कॅपिटलच्या ऑफरमधून निधी उभारण्याची योजना आखत आहे. या सार्वजनिक इश्यूमध्ये प्रति शेअर दर्शनी किंमत १0 असलेल्या जास्तीत जास्त १,७०,००,००० नवीन इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

बीएलएस पॉलिमर्स लिमिटेड विविध प्रकारच्या पॉलिमर कंपाऊंड्सच्या निर्मितीमध्ये गुंतलेली आहे. पॉलिमर कंपाऊंड्सचा वापर वीज, दूरसंचार आणि रेल्वे उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वायर व केबल्सच्या शीथिंग, जॅकेटिंग आणि इंसुलेशनसाठी आवश्यक कच्च्या मालाप्रमाणे होतो. तसेच, जमिनीखालील तेल, वायू आणि पाण्याच्या नळ्या संरक्षित करण्यासाठी कोटिंग म्हणूनही याचा वापर केला जातो, ज्यामुळे या संरचनांना कोरोजन आणि बाह्य पर्यावरणीय घटकांपासून संरक्षण मिळते. (स्रोत: सीआरआयएसआयएल अहवाल). कंपनीचे उत्पादन तेल, वायू, पाणी यांसारख्या महत्त्वाच्या उद्योगांमध्ये उच्च कार्यक्षमतेच्या अनुप्रयोगांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

युनिस्टोन कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड या इश्युचे एकमेव बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र परिणामांचा असेल. खूप मेहनत केल्यानंतर तुम्हाला यश मिळेल. विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.

**वृषभ :** गैरसमज टाळण्यासाठी स्पष्ट संवाद साधा. आरोग्यासाठी नियमित व्यायाम करणे फायदेशीर ठरेल. पण कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी विचार करा. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन :** कोणीतरी बाहेरील व्यक्ती तुमच्या कुटुंबात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करेल. परंतु तुम्ही विवेकाने वागले पाहिजे. तुमच्या कुटुंबाची एकता टिकवून ठेवण्यात तुमचे प्रयत्न यशस्वी होतील.

**कर्क :** व्यवसायातील समस्यांबद्दल सतर्क राहण्याची गरज असेल. एखादी अप्रिय बातमी मिळू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या कनिष्ठांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने तुम्ही अस्वस्थ व्हाल.

**सिंह :** आज तुमच्या कामावर अधिक लक्ष केंद्रित कराल. तुमच्या मेहनतीमुळे तुम्हाला यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. पण थोडी काळजी घेणे आवश्यक आहे.

**कन्या :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. सासरचे लोक आल्यानंतरही महत्त्वाच्या कामातील कोणताही अडथळा दूर होईल. रेस्टॉरंटच्या कामाशी संबंधित लोकांना विशेष यश मिळेल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाईल. तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल, ज्यामुळे तुमचे नाते अधिक घट्ट होईल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमच्या सहकाजयांची मदत मिळेल.

**वृश्चिक :** आजचा दिवस खूप व्यस्त असू शकतो. अचानक अनेक जबाबदाजया खांद्यावर पडतील आणि त्या तुम्हाला पार पाडाव्या लागतील, ज्यामुळे थोडा ताण जाणवेल. संध्याकाळपर्यंत सर्व काही सुरळीत होईल.


**धनु :** कठोर परिश्रम करूनही व्यवसायात अपेक्षित यश न मिळाल्याने तुम्ही दु:खी व्हाल. वडिलोपार्जित मालमत्तेवरून कुटुंबात निरर्थक वाद होऊ शकतात. आज बोलताना कठोर शब्द वापरू नका.

**मकर :** कुटुंबाशी संबंधित आणि आर्थिक व्यवहारांमध्ये काही चांगले बदल होतील. आरोग्याची काळजी घ्या. सकारात्मक विचार करा. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने तुम्हाला आनंद मिळेल.

**कुंभ :** आज काही नवीन संधी मिळतील, ज्यामुळे करिअरमध्ये प्रगती होईल. कामाच्या ठिकाणी तुमचे कौतुक होईल. आज तुम्ही नवीन काम सुरु करण्याचा विचार करू शकता. खाण्यापिण्याच्या वेळा चुकवू नका.

**मीन :** तूळ राशीच्या व्यक्तींसाठी आजचा दिवस सकारात्मक ऊर्जा घेऊन येईल. तुमच्या कामात यश मिळेल. बाहेरचे खाणे टाळा. राजकारणासारख्या वादग्रस्त विषयांमध्ये पडू नका.

## शब्दकोडे क्रमांक २१८९



**आडवे शब्द :-**
१) घरातील शत्रू
७) हिंदुस्थान
९) लबाडीचा हेतू
११) कुंड्यांना लावण्याचा रंग
१२) जाडसर पीठ
१३) राजाचा कालावधी
१५) त्वरित
१७) साखरेचा रस
१८) गोमाता
१९) आवाज, नाद
२०) बाजेची कापडी पट्टी
२१) हाणामारी
२४) राजाची कचेरी
२६) च्या प्रमाणे
२७) पवन
२८) मान खाली घातलेला
३०) तेव्हा(हिं)
३१) वकीलांची बसण्याची जागा
३२) हाण, ठोक
३४) सातूचे पीक
३५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
३६) हाताचा तळवा
३८) घराचा मागचा दरवाजा
४०) निकट
४३) वसन
४४) दारूचा एक प्रकार
४६) वाद्य वाजविण्याची कला
४७) छोटी घागर
४८) सोन्या चांदीचा व्यापारी
५०) विहीर
५१) रात्रीचा पाऊस
५३) तत्काळ, लगेच
५६) वस्ती
५९) एक ज्वालाग्रही पदार्थ
६०) व्यापारात जम बसविलेली एक जमात
६२) प्रतिलेख, नक्कल
६३) इंद्रिय, घटक
६५) घोडा
६६) एक पौराणिक प्रेमिकांची जोडी
६८) पाण्याचे मृत्तिका पात्र
६९) नट्टापट्टा करणारा
७१) मीठ
७३) नारळाच्या आंत वाढलेला कोंब
७५) पुष्कळ
७६) राखण्याची मजुरी
७७) बारीक मऊ केस
७८) छाती,
७९) इच्छा
८०) खेद, दुःख

**उभे शब्द :-**
१) दुष्काळ (हिं.)
२) च्या साठी
३) धनुष्यबाण
४) सत्ता
५) नमकीन
६) शासकीय
७) स्तुती करणारा
८) समशेर
९) कावळा
१०) नियमित यात्रा करणारा
१४) आशीर्वाद देणारा गणपती
१६) नवरदेव
१७) पारद
२०) मुस्लीम सरदार
२१) चणचण
२२) पद्धतीप्रमाणे
२३) माजलेला
२५) अर्धा शेर
२६) पुन्हा पुन्हा
२९) अभिप्राय
३१) छोटा, लहान
३३) प्रज्वलित, तापलेले
३५) गवताचे पान
३७) रेशीमाची गुंडाळी
३८) घागरा
३९) किंमत, पैसा
४१) हत्ती
४२) जमिनीखाली येणारे फळ
४५) उंच मानेचा एक प्राणी
४६) पूर्वज
४८) प्रभात
४९) सभा जिंकणे, (वा.प्र.)
५१) रात्र
५२) वास लावलेले
५४) बेडकाचे ओरडणे
५५) पोपट
५७) अन्यायाचे, बेशिस्त
५८) किंमत, निष्ठा
६१) उणीव, दुर्भिक्ष
६२) वाट पाहाणे
६३) किमती, बहुमोल
६४) कालपुरुष
६७) रुग्णालय
७०) रोखलेली नजर
७२) प्रजा
७४) ग्राम, नगर
७६) सीतापती

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पोक्सो गुन्ह्यातील आरोपी फरार

**नाशिक ।** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पवननगर पोलीस चौकीतून पोक्सो कायद्यांतर्गत अटक केलेला संशयित पवन नगर चौकीच्या भिंतीवरुन उडी मारून पोलीसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाल्याची घटना घडल्याने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे. पोक्सो गुन्ह्यात अतुल प्रकाश तुंबडे याला काही दिवसांपूर्वी अंबड पोलिसांच्या पथकाने राहता येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले होते. शनिवारी न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.शनिवारी दुपारी संशयित आरोपी अतुल तुंबडेला पवननगर पोलीस चौकीत आणून पंचनामा सुरू असताना, त्याने संधी साधून पोलिसांना चकवा देत पवननगर चौकीच्या भिंतीवरून उडी मारून पसार झाला आहे दरम्यान अंबड पोलीस ठाण्याच्या. सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक सविता उंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा सुरू असतानाच ही घटना घडल्यामुळे एकच गोंधळ उडाला. या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अंबड पोलिसांनी विविध भागांत शोधमोहीम सुरू केली आहे. संशयिताला पकडण्यासाठी स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. मात्र पोलीस कोठडीत असलेला आरोपी पोलिसांच्या हातून पसार झाल्यामुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### विद्यार्थीनींनी सैनिकांना पाठविल्या तिरंगी राख्या, पोस्ट कार्ड

**नाशिक ।** ज्ञानवर्धिनी विद्या प्रसारक मंडळ संचलित डे केअर सेंटर शाळेतील विद्यार्थ्यांनी तिरंगा राखी उपक्रमांतर्गत सैनिक बांधवांसाठी लिहिलेले पत्र व विद्यार्थ्यांनी स्वतःतयार केलेल्या राख्या अशा एकूण ३०० राख्या व १७० पत्र देऊन सैनिक बांधवांना रक्षाबंधनाच्या व १५ ऑगस्टच्या शुभेच्छा दिल्या. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील प्राचार्याअनुजा पाठक यांच्या मार्गदर्शना नुसार तिरंगा राखी व शुभेच्छा पोस्ट कार्ड आर्टिलरी सेंटर जयभवानी रोड, नासिक रोड या ठिकाणी आर्मी ऑफिसर मेजर अमित कुमार यांच्याकडे शाळेतील विद्यार्थी हिमांशू देशमुख व लोकेश चव्हाण इयत्ता दहावी व महाविद्यालयातील विद्यार्थी मयूर जाधव इयत्ता बारावी कॉमर्स मराठी माध्यम व सुमित खाडे इयत्ता बारावी कॉमर्स इंग्रजी माध्यम तसेच शिक्षक भास्कर पवार, प्रवीण साळुंके व विनायक शिंदे यांनी प्रत्यक्ष आर्टिलरी सेंटर येथे जाऊन सैनिक बांधवां साठी लिहिलेले पत्र व विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्याअशा एकूण ३०० राख्या व १७० पत्र देऊन सैनिक बांधवांना रक्षाबंधनाच्या व १५ ऑगस्टच्या शुभेच्छा दिल्या..

### सप्तश्रृंग गड येथे अवयव दान मार्गदर्शक सूचना रॅली

**सप्तश्रृंग गड ।** प.पू.ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्री सप्तश्रृंगी गड येथे मुख्याध्यापक शशिकांत देसले यांच्या मार्गदर्शनाने व आरोग्यवर्धिनी केंद्र श्री सप्तश्रृंगी गड यांच्या मार्गदर्शक सूचनेने अवयव दान दिनानिमित्त विद्यालयाच्या विज्ञान छंद मंडळ



अंतर्गत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी घोषणा देत,बॅनर्स सह जनजागृतीपर रॅली काढली,समुदाय आरोग्यअधिकारी दिप्ती गोसावी यांनी वर्णन करताना सांगितले "अवयव दान हे सर्व दानांमध्ये श्रेष्ठ दान आहे"असं म्हटलं जातं,कारण ते एका नव्हे तर अनेक जणांच्या जीवनात नवा प्रकाश, नवी आशा आणू शकतं. मृत्यूनंतरही आपले अवयव दुसऱ्याच्या आयुष्यात नवा सूर्योदय घडवू शकतात,हेच अवयवदानाचं थोरपण आहे.आरोग्य सेवक अधिकारी दिनेश शेवाळे यांनी अवयवदान प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना दिली.आरोग्य सेविका प्रतीक्षा जाधव यांनी अवयव दान या विषयी विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली. या रॅलीसाठी बनविलेल्या बॅनर व रांगोळीत उत्कृष्टतेच्या निकषावर साई यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.या उपक्रमासाठी संजय ठोके,सतिष बोरसे, विलास पवार,सिमा गांगुर्डे,प्रतिभा बोरस्ते, आकाश सोनवणे, अरविंद पवार,कैलास गवळी,वसतिगृह अधीक्षक गोरख भोये, निखिल पाटील यांनी परिश्रम घेतले.

### बबन अस्वले यांचे निधन



**दिंडोरी ।** सातपूर नाशिक येथील रहिवाशी बबन आप्पाजी अस्वले (७३) यांचे दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा-सुन,चार मुली,नातवंडे असा परिवार आहे.पत्रकार बाळासाहेब अस्वले यांचे ते मोठे बंधू होत.

### शांताबाई केंग यांचे निधन



**दिंडोरी ।** जानोरी येथील शांताबाई भिमा केंग यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर केंग यांच्या आई व माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ केंग यांच्या चुलत्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, चार मुली, सुन, नातू असा परिवार आहे.

# सिव्हिलमधून रुग्णांना बळजबरी डिस्चार्ज; राष्ट्रवादीकडून आंदोलन





**नाशिक ।** जिल्हाशासकीय रुग्णालय मधून बळजबरीने रुग्णांना डिस्चार्ज देत असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड सुरेश आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर गावित यांना ड्रेसिंग किट भेट देण्यात येवून प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून जिल्हा शासकीय रुग्णालय अनेक समस्यांनी ग्रासलेले असून कधी निष्काळजी पणामुळे बाळांची अदलाबदल होणे, जिवंत अर्भकाला मृत म्हणून घोषित करणे तसेच विविध विभागातील भ्रष्टाचार, शासकीय रुग्णालय नेहेमीच चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून जिल्हा शासकीय रुग्णालात ड्रेसिंग साठी लागणारी औषधे व साहित्य उपलब्ध नसल्याने रुग्णांवर उपचार न करताच रुग्णांना डिस्चार्ज देत असून अनेक रुग्णांना उपचाराविनाच परतावे लागत आहे. सलग दोन दिवस जिल्हा शल्य चिकित्सक सुट्टीवर असल्याने रुग्णांना वाऱ्यावरच सोडून दिले जात असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आक्रमक झाल्याचे पाहिला मिळाले.जिल्हा शल्य चिकित्सक कधीच जागेवर नसल्याने त्यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ओबीसी सेल चे जिल्हाध्यक्ष ॲड.सुरेश आव्हाड, महिला जिल्हाध्यक्षा संगीता पाटील, हाजी मोहिय्योदीन शेख, नासीर पठाण, भारती चित्ते, मीरा भोईर, ॲड.संदीप दंडगव्हाण, गणेश धोत्रे, मोहित शेंडगे, प्रणव पगारे, अविनाश राजगुरू, मंगेश भंडारी, सविता किरकिरे आदी उपस्थित होते.

## इंदिरानगर पोलीस स्टेशन येथे राखी पौर्णिमा साजरी

**नाशिक ।** राखी पौर्णिमेनिमित्त इंदिरानगर पोलीस स्टेशन येथे राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली.

सर्व महिलांनी माननीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे मॅडम यांना राखी बांधून ओवाळणी मागितली इंदिरानगर मधील महिलांना ओवाळणी काय हवी? सर्व महिलांनी मिळून इंदिरानगर परिसरात व श्रीराम उद्यान (सिटी गार्डन) परिसरात महिलांना होणारा त्रास जसा की गाडीवर येऊन महिलांना मागच्या साईडने मारणे जोरजोरात अश्लीश आवाज करणे गाड्यांचे कट मारणे आता तर हद्दच केली दोन दिवसापूर्वी एका महिलेवर, दोघेजण गाडीवर जाताना तिच्या जवळ जाऊन तिच्या अंगावर थुंकून गेले. किती हा घाणेरडा प्रकार चीड येणारा प्रकार करण्याची हिम्मत लोक करत आहेत याला वेळीच रोखले पाहिजे व महिलांना संरक्षण दिले पाहिजे.



महिलांनी रस्त्याने चालू नाही का? असा प्रश्न समस्त महिलांनी तृप्तीताई यांना विचारला. व आम्हाला न्याय मिळावा. असे घाणेरडा प्रकार कोणी करू नये, अशी विनंती केली. तृप्ती ताई सोनवणे यांनी आश्वासन दिले की शोध काढतो व कारवाई करतो व महिलांना आवाहन केले की, यात महिलांनी घटना घडताच समोर यावे, ११२ क्रमांकावर तात्काळ फोन करून पोलीस मदत मागावी. महिलांनी न घाबरता तक्रार करावी याबाबत माहिती दिली. यावेळी अर्ज देताना सौ. सोनाली कुलकर्णी, सौ. सुहासिनी रत्नपारखी, सौ. प्रेरणा ताई जोशी, सौ. वंदना मोघे, सौ.मंजुषा जोशी, सौ.अश्विनी कुलकर्णी, सौ. गीता पोळ, सौ. आर्या बुडूख, सौ. सोनाली काळे, सौ.ऋचा लघाटे, सौ. किर्ती जोशी, आकांक्षा देशपांडे उपस्थित होत्या.

## रोविंगपटू धनश्री यांनी क्रीडामंत्र्यांना बांधली राखी

### धनश्रीची आर्थिक जबाबदारी घेण्याचे दिले आश्वासन

**नाशिक ।** जर्मनीत नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्समध्ये सिंगल स्कल रोविंग प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रोविंगपटू धनश्री भास्कर सांगळे यांनी रक्षाबंधनाच्या दिवशी क्रीडा व युवक कल्याणमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांना राखी बांधली. यावेळी कोकाटे यांनी तिला खेळण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचे आश्वासन क्रीडामंत्री कोकाटे दिले.

सिन्नर तालुक्यातील पाटोळे या गावात धनश्री यांच्या जागतिक पातळीवरील मिळविलेल्या यशाबद्दल क्रीडामंत्री कोकाटे यांच्यावतीने सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमात राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री कोकाटे यांची प्रमुख उपस्थिती



होती. या कार्यक्रमात धनश्री आणि तिचे वडील भास्कर सांगळे, रेखा सांगळे,आजी पार्वताबाई केदार या कुटुंबातील सदस्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यादरम्यान भाषण करताना मंत्री कोकाटे म्हणाले की "ज्या आजीने तुला वेळोवेळी पैसे पुरविले, त्या आजीने आणि तू मला आज रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधली आहे. त्यामुळे तू काळजी करू नकोस. राज्याचा क्रीडामंत्री हा तुझा भाऊ आहे. तुला कुठेही कमी पडू देणार नाही." या कार्यक्रमाला खासदार राजाभाऊ वाजे, सरपंच मेघराज आव्हाड, क्रीडा उपसंचालक साळूंखे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळनेर-सटाणा महामार्गावर भीषण अपघात

### कंटेनर, कारच्या अपघातात कार 'चक्काचूर'



**पिंपळनेर ।** पिंपळनेर-सटाणा महामार्गावर कार व कंटेनर यांच्यात ओव्हरटेक करतांना झालेल्या भीषण अपघातात कारचालक किरकोळ जखमी तर कारचे मोठे नुकसान झाले आहे. अपघात झाल्यानंतर या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती तर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

या प्रकरणी कारला धडक देणाऱ्या अज्ञात कंटेनर चालका विरुद्ध पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपळनेरहुन नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या कारला कंटेनरने मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात फोर्ड कार चक्काचूर झाली आहे.या भीषण अपघातात सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी कारचालक किरकोळ जखमी झाला आहे.तर अपघातग्रस्त कारचे मोठे नुकसान झाले आहे. सनतकुमार खंडेराव सोनवणे (वय ४५ रा.श्रीहरी बंगलो, दामोदर नगर, पाथर्डी फाटा, नाशिक) हे एका खाजगी कंपनीत नोकरी करतात.त्यासाठी त्यांनी २०१६ मध्ये फोर्ड कंपनीची फयुजन कार क्रमांक एमएच १५ बी एक्स ६१५३ ही लाल रंगाची कार घेतली आहे.९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता ते सदर कारने अँरोलॅम लिमीटेड कंपनीच्या प्लायवुडचा प्रचार व विक्रीसाठी नाशिक येथुन निघाले होते.त्यांनी दिवसभर नंदुरबार तळोदा, पिंपळनेर अशा ठिकाणी



प्रचार व विक्री केल्यानंतर दुपारी ३.५० वाजेच्या सुमारास पिंपळनेर शहराकडून नाशिककडे सदर कारने जात असतांना पिंपळनेर-सटाणा मार्गावरील आनंद पेट्रोलपंप समोरील रस्त्यावर मागुन ओव्हरटेक करणारे कंटेनर वाहन क्रमांक जीजे १२ बीव्ही ८१९१ या कंटेनरने कारला मागुन जोरदार धडक दिल्याने कारचे मोठे नुकसान झाले. या अपघातात कारमधील सनतकुमार सोनवणे यांच्या हाताला,डोक्याला व पायाला मुक्कामार लागला असुन कारचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान जीजे १२ बीव्ही ८१९१ या क्रमांकाच्या वाहनचालकाने बेदरकारपणे रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन कारला मागुन जोरदार धडक दिल्याने कारचे व कंटेनरच्या नुकसानीस कारणीभुत झाल्याने अज्ञात कंटेनर चालकाविरुध्द पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आय. जी. शिरसाठ हे करीत आहेत.

## वृक्षांना राख्या बांधत साजरे केले रक्षाबंधन; दायित्व सेवाभावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम





**दायित्व सेवाभावी संस्थेतर्फे वृक्षांना राखी बांधून पर्यावरणाचा गोमटा संदेश देण्यात आला. सिडकोतील अंबिकानगर, रायगड चौक, दुर्गानगर येथे वृक्षांना राख्या बांधताना महिला-भगिनी. (छाया सोज्ज्वळ साळी)**

**नाशिक ।** वृक्षतोड थांबावी, त्यासाठी पर्यावरणाचा जागर व्हावा, त्यातून गोमटे वृक्षसंवर्धन घडावे, निसर्गसंपदेची वृद्धी व्हावी, सर्वत्र हिरवेकंच वातावरण व्हावे अन वृक्षसंपदा जोपासली जावी या उदात्त हेतूने निसर्ग-वृक्षप्रेमी महिला-भगिनींनी दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या उपक्रमांतर्गत वृक्षांना राखी बांधत अनोखे रक्षाबंधन साजरे केले.

दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने सलग तिसऱ्या वर्षीही हा वृक्षबंधनाचा उपक्रम राबवत पर्यावरणाचा जागर केला. वृक्ष-झाडे यांनाच बंधू मानत त्यांना राखीच्या धाग्यात बद्ध करीत त्यांच्या संवर्धन, संगोपनाचे समस्त महिलांना आवाहन केले. वृक्षराजी वाढली तरच पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. त्यासाठी लोकजागर व्हावा म्हणून संस्थेने उपक्रम राबविल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सिडकोतील अंबिकानगर, दुर्गानगर, रायगड चौक



आदी ठिकाणी संस्थेच्या पदाधिकारी महिलांनी सामूहिक वृक्षबंधनाचा कार्यक्रम राबविला. संस्थेच्या अध्यक्ष पूजा भावसार, खजिनदार सीमा परदेशी, पदाधिकारी आणि समस्त सदस्यांनी परिसरातील महिलांना सामूहिक वृक्षबंधन कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यास प्रतिसाद देत अनेक महिला या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागि झाल्या होत्या.

यावेळी महिलांनी घरी तयार केल्या पर्यावरणपूरक राख्या परिसरातील वृक्षांना बांधल्या. उभा अनोख्या रक्षाबंधन कार्यक्रमाला अंबिकानगर येथील सुप्रिया जोशी, गिरीजा चौबे, मंजुषा भोसले, अश्विनी धुमाळ, सीमा तागडे, रश्मी तागडे, अरसुळे मॅडम, पुष्पावती अडसुळे, रायगड चौक येथील हर्षदा गरुड, क्षितिजा भावसार, ऋतुजा भावसार, सुरेखा गरुड, विजया भावसार, सुरेखा डावरे, पूजा डावरे, स्वाती भावसार, मीना साळी, अर्चना चव्हाण, सुनीता शिंदे, सोनाली शिंदे, पुष्पा तिरके, दुर्गानगर येथील मोनिका आशीर्वादम, जान्हवी पवार, वंदना देसाई, सुनीता दास, अश्विनी देसले, लीना कुलकर्णी, स्वरा कुलकर्णी, विला वळवी, शुभदा चौधरी, प्रभुदिनी चौधरी आदींसह सदस्य आणि महिलांनी आपापल्या रहिवास परिसरातील वृक्षांना राख्या बांधत अनोखे रक्षाबंधन साजरे केले.

### वृक्ष संवर्धनाच्या घेतल्या आणाभाका

दायित्व संस्थेच्या व्यासपीठावरून वृक्षांना राखी बांधून अनोखे रक्षाबंधन साजरे करण्याची कल्पना सर्वच महिला-भगिनींना भावली. यावेळी अनेक महिला-भगिनींनी नियमितपणे वृक्षसंवर्धन करण्याचा संकल्प केला. वृक्ष संवर्धनाचा जागर करण्याचाही मनोदय अनेकांनी बोलून दाखविला.

"वृक्षतोड थांबली पाहिजे. वृक्ष लागवड होऊन त्यांचे संवर्धन, संगोपन झाले पाहिजे. ही काळाची गरज आहे. त्यासाठी दायित्व संस्थेने राबविलेला हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. कोणत्याही प्रकारे वृक्षसंवर्धन होणे आवश्यक आहे. महिलांनी वृक्षांना आपले बंधू समजून त्यांच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतला पाहिजे.


**- मोनिका आशीर्वादम, दुर्गानगर, सिडको**

# कॅलिडोस्कोप

## शिव्यांमध्ये दिल्लीकर आघाडीवर

शिव्या हा कोणत्याही भाषेचा अविभाज्य भाग असतो, असे भाषाविषयक तज्ज्ञ म्हणतात. अर्थात शिव्या देणे वाईटच आहे. मात्र शिव्यांच्या व्युत्पत्तीपासून त्या कशा बदलत गेल्या, यासंदर्भातील अभ्यास अनेक भाषा तज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. मन मोकळे करण्यासाठी, राग व्यक्त करण्यासाठी तोंडून अपशब्द निघतो, असे शिव्या देणारे सहज मान्य करतात. शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे.

भारतातील कोणत्या राज्यात सर्वाधिक शिव्या दिल्या जातात, या प्रश्नाचे उत्तर दिल्ली असे आहे. दिल्लीतील लोक सर्वात जास्त अपशब्द वापरतात, असे एका सर्वेक्षण अहवालात असे दिसून आले आहे. आया–बहिणींवरुन शिव्या आणि मुलींना लक्ष्य करणारे अपशब्द राजधानीत सर्वात साम न्यपणे वापरले जातात. सर्वेक्षणानुसार दिल्लीतील ८० टक्के लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात अपशब्द वापरतात. 'सेल्फी विथ डॉटर फाउंडेशन'चे संस्थापक आणि महर्षी दयानंद विद्यापीठातील प्रॅक्टिसचे प्राध्यापक डॉ. सुनील जगलान यांनी 'गाली बंद घर अभियान' सुरू केले आणि या




उपक्रमाचा एक भाग म्हणून वेगवेगळ्या राज्यांमध्ये दीर्घकालीन सर्वेक्षण करण्यात आले. ११ वर्षांच्या कालावधीत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात ७० हजार लोकांकडून प्रतिसाद नोंदवण्यात आला. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या लोकांमध्ये वेगवेगळ्या समाजिक स्तरांतील प्रतिनिधी होते. तरुण, पालक, शिक्षक, डॉक्टर, ऑटो चालक, शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलिस, वकील, व्यापारी, स्वच्छता कर्मचारी, प्राध्यापक आणि पंचायत सदस्य यांचा समावेश होता.

सर्वाधिक शिव्या देणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबमधील ७८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरल्याचे मान्य केले आहे. उत्तर प्रदेश (यूपी) आणि बिहार प्रत्येकी ७४ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले. राजस्थानमधील ६८ टक्के आणि हरियाणा ६२ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले. महाराष्ट्रातील ५८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले आहे. या यादीत महाराष्ट्र सातव्या स्थानावर आहे. त्याखालोखाल गुजरातमधील ५५ टक्के लोकांनी अपशब्द वापरतो असे मान्य केले आहे. मध्य प्रदेशमधील ४८ टक्के आणि उत्तराखंड ४५ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले आहे.

सर्वात कमी शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये जम्मू आणि काश्मीर सर्वात खालच्या क्रमांकावर आहे. येथील फक्त १५ टक्के लोकांनी अपशब्द वापरल्याचे सांगितले आहे.



## इंग्रज बनला 'शाही तुकडा' फॅन!

भारतीय जेवणाची आवड परदेशी लोकांसाठी नवीन नाही. येथील चव गोऱ्या लोकांच्या जिभेवरही रेंगाळते. पण पहिल्यांदाच शाही तुकडा खाण्यासाठी एक परदेशी व्यक्ती सुरुवातीला संकोच करत होती. त्याला त्याची चव कशी असेल हे माहीत नव्हते. पण त्याने तो खाल्ला तेव्हा त्याने आनंदाने उड्यचा मारल्या. दिल्लीच्या बाजारात फिरत असताना त्याची नजर एका मोठ्या थाळीत सजवलेल्या शाही तुकड्यावर पडली. त्याने प्रथम दुकानदाराकडून त्याचे नाव आणि दर निश्चित केला. दुकानदाराकडून शाही तुकडा घेऊन तो रेस्टॉरंटमध्ये गेला. रील करण्यासाठी कॅमेरा सुरू करून तो म्हणतो, माझ्याशिवाय या छोट्या रेस्टॉरंटमध्ये कोणीच नाही. शाही तुकड्याचा वास घेतल्यानंतर तो एक विचित्र प्रतिक्रिया देतो. त्याचा छोटा तुकडा घेतो आणि त्याची चव चांगली नसेल असे समजून जिभेवर ठेवतो. प्रत्यक्षात जिभेवर तो तुकडा ठेवल्यानंतर त्याचा मूडच बदलला. तो आनंदाने उड्या मारायला लागला. तो म्हणाला, यापेक्षा जगात दुसरे काहीही चांगले असू शकत नाही. मी याला १० पैकी १० गुण देईन. यानंतर तो पटकन ते संपवून तिथून निघून जातो. शाही तुकडा एक गोड पदार्थ आहे. तो ब्रेड, क्रीम आणि देशी तूप वापरून बनवला जातो.



## लोखंडाशिवाय बांधलं मंदिर

हरयाणातल्या अंबाला सिटीतल्या गीतानगरीमध्ये अनोख्या जैन मंदिराची उभारणी सुरू आहे. जैन मुनी विजय इंद्रदिन्न सुरिश्वर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे मंदिर उभारलं जात आहे. या मंदिराचा आकार गोल असेल. हे मंदिर बांधण्यासाठी संगम रवराचा वापर केला जात आहे. या मंदिराच्या उभारणीत लोखंडाचा अजिबात वापर झालेला नाही. लोखंडाचा एखादा खिळाही ठोकण्यात आलेला नाही. अशा प्रकारचं हे उत्तर भारतातलं पहिलंच मंदिर आहे. २०११ मध्ये या मंदिराच्या उभारणीला सुरूवात करण्यात आली. या मंदिराचा नकाशा कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाने नाही तर खुद्द जैन मुनी विजय रत्नाकर सुरिश्वर यांनी तयार केला आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार हे मंदिर बांधलं जात आहे. या मंदिराचं बांधकाम जैन स्थापत्यशैलीत केलं जात आहे. संगमरवरावरचं नक्षीकाम राजस्थानमध्ये केलं जात आहे. असं हे अनोखं जैन मंदिर अंबालाची शान ठरणार आहे.



## असा हा नेपच्यून

आपली सूर्यमाला अनेक रहस्यांनी भरलेली आहे. पृथ्वी हा सौरमालेतला तिसरा ग्रह. या पृथ्वीवरच जीवसृष्टी बहरली, फुलली. माणसाला मंगळ ग्रहाचं प्रचंड आकर्षण आहे. मंगळावर जीवसृष्टीचं अस्तित्व आहे का, याचा शोध सुरू आहे. आपल्या सौरमालेतल्या चार ग्रहांवर दगड, माती नाही तर वायू आहेत. म्हणूनच हे ग्रह खूप धोकादायक मानले जातात. नेपच्युन, गुरू, शनी आणि युरेनस असे हे चार ग्रह आहेत. नेपच्यून हा ग्रह पृथ्वीपासून खूप लांब आहे. तसंच तो धोकादायकही आहे. या ग्रहावरचं तापमान उणे २०० इतकं असतं. म्हणजे या ग्रहावर जाण्याचा विचारही आपण करू शकणार नाही. २३ सप्टेंबर १८४६ रोजी या दिवशी नेपच्यूनला पहिल्यांदाच दुर्बिणीतून पाहिलं गेलं. या ग्रहाला नेपच्यून हे नाव देण्यात आलं. या ग्रहाच्या अस्तित्वाच्या शक्यता त्याच्या शोध लागण्याआधीच व्यक्त करण्यात आल्या होत्या.

नेपच्यून हे रोमन देवतेचं नाव आहे. नेपच्यूनवर मिथेन वायूपासून तयार झालेले ढग आहेत. इथे हवा खूप वेगाने वाहते. इथले वारे १५०० मैल प्रति तास एवढ्या वेगाने वाहतात. नेपच्यूच्या वातावरणात कार्बनचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे इथे हिऱ्यांचा पाऊस पडतो. असा हा नेपच्यून सर्वार्थाने अनोखा आहे.




## सर, मी विकला गेलोय!

मध्यंतरी एक मजेदार राजीनाम्याचा ईमेल 'सोशल मीडिया'त प्रचंड व्हायरल झाला होता. या ईमेलमध्ये त्या व्यक्तीने इतक्या प्रामाणिकपणे आणि मोकळेपणाने आपली गोष्ट लिहिली आहे की ती वाचून कोणीही आपले हसू आवरू शकत नाही. मुंबईतील 'हिंग्लिश' या ब्रँडचे संस्थापक आणि 'सीईओ' शुभम गुणे यांनी 'लिंक्डइन'वर मजेदार राजीनामापत्र शेअर केले होते. अल्पावधीतच ते व्हायरल झाले. 'ईमानदार इस्तीफा' या कॅप्शनसह ते शेअर करण्यात आले आहे.

या ईमेलमध्ये 'नमस्ते सर, मी विकला गेलोय. समोरची कंपनी मला चार पैसे जास्त देतेय', असे लिहिले आहे. कमेंट सेक्शनमध्ये या ईमेलला भरघोस प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी याला प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनातील भावनांचा आवाज म्हटलंय. एका यूजरने मजेशीरपणे म्हटले, 'तुमच्या ईमेलमधील स्पष्टतेचा हा खरा अर्थ आहे. आम्ही नेहमीच याला चुकीच्या पद्धतीने समजत आलो आहोत. दुसऱ्या एका यूजरने लिहिले, 'हा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अंतरात्म्याचा आवाज आहे.' ही मजेदार पोस्ट आणि त्यावरील प्रतिक्रिया यामुळे 'सोशल मीडिया'वर या राजीनामा पत्राची जोरदार चर्चा झाली.

अनेकांनी या ईमेलच्या साधेपणाला आणि प्रामाणिकपणाला दाद दिली आहे. या ईमेलने कर्मचाऱ्यांच्या मनातील खऱ्या भावना हलक्या–फुलक्या पद्धतीने मांडल्या असून इंटरनेटवर क्रिएटिव्हिटी आणि विनोद याची कमतरता नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.

## विवाहबाह्य संबंधात कांचीपूरम्‌ची आघाडी

भारतात विवाहबाह्य संबंध आता केवळ महानगरांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. आता टियर–२ आणि टियर–३ शहरांमधील लोकदेखील नात्यांसाठी 'पर्याय' शोधत आहेत. जगातील सर्वात लोकप्रिय अतिरिक्त विवाहबाह्य डेटिंग प्लॅटफॉर्म 'अॅशले मॅडिसन' च्या जून २०२५ च्या आकडेवारीने याची पुष्टी केली आहे. या अहवालानुसार, तामिळनाडूतील कांचीपूरम्‌ हे छोटे शहर या वेळी भारतातील सर्वाधिक 'अॅशले मॅडिसन' वापरणारे शहर बनले आहे.

गेल्या वर्षी हे शहर १७ व्या स्थानावर होते आणि आता अचानक ते दिल्ली आणि मुंबईसारख्या मेट्रो शहरांना मागे टाकत पहिल्या क्रमांकावर आले आहे. कांचीपूरम्‌ हे भारतातील विवाहबाह्य संबंधाचे हब बनले आहे. रेशमी साड्या आणि मंदिरांसाठी ओळखले जाणारे कांचीपूरम्‌ आता 'अॅशले मॅडिसन'च्या आकडेवारीनुसार वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. या शहराची लोकसंख्या फक्त २ लाख आहे. परंतु येथील विवाहबाह्य डेटिंगच्या अनेक घटनांनी मोठ्या महानगरांना मागे टाकले आहे. या वर्षीच्या टॉप २० यादीत मुंबईचे



नाव कुठेही नाही. तर दिल्ली–एनसीआरमधील ९ भागांचा या यादीत समावेश आहे. यामध्ये मध्य दिल्ली, दक्षिण पश्चिम दिल्ली, पूर्व दिल्ली, दक्षिण दिल्ली, पश्चिम दिल्ली, उत्तर पश्चिम दिल्ली, गुडगाव, गाझियाबाद आणि नोएडा (गौतम बुद्ध नगर) सारखी शहरे समाविष्ट आहेत.

या यादीत जयपूर, रायगड, कामरूप आणि चंदीगडसारखी इतर अनेक लहान शहरेदेखील समाविष्ट आहेत. एप्रिल २०२५ मध्ये 'अॅशले मॅडिसन'ने 'यूगव्ह'द्वारे एक सर्वेक्षण प्रसिद्ध केले. त्यात असे दिसून आले, की भारत आणि ब्राझीलमध्ये विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या सर्वेक्षणात आपले कधी ना कधी विवाहबाह्य संबंध होते, असे ५३ टक्के भारतीयांनी कबूल केले. या अहवालातून भारतात पारंपारिक संबंधांची व्याख्या बदलत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अगदी आत्तापर्यंत समाजात लग्न आणि वचनबद्धतेबद्दल कठोर मूल्ये होती, तर आता लोक उघडपणे त्यांचे पर्याय शोधत आहेत. 'अॅशले मॅडिसन'सारखे प्लॅटफॉर्म अशा लोकांसाठी 'गुप्त मार्ग' बनत आहेत.



## मंत्री पत्नीलाच विसरले!

एका अत्यंत विचित्र घटनेमुळे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान मध्यंतरी इंटरनेटवर चर्चेचा विषय ठरले होते. केंद्रीय कृषिमंत्री एक दिवसाच्या गुजरातच्या धार्मिक दौऱ्यावर होते. या भेटीदरम्यान त्यांनी जुनागडमधील सोमनाथ ज्योतिर्लिंग मंदिर आणि गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट दिली. नंतर ते 'पीनट रिसर्च सेंटर'च्या शेतकऱ्यांशी आणि 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थींशी संवाद साधणार होते. त्यांना रात्री आठ वाजता राजकोटहून विमानाने प्रवास करायचा होता. त्यामुळे ते कार्यक्रम, भेटीगाठी लवकर संपवण्याच्या घाईत होते. संशोधन केंद्राच्या भेटीदरम्यान, त्यांनी कर्मचाऱ्यांसोबत कामाचा आढावा घेतला तर त्यांच्या पत्नी, साधना प्रतीक्षागृहात बसल्या होत्या. त्यानंतर शिवराज यांनी 'लखपती दीदी' योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ते वारंवार त्यांच्या घड्याळाकडे पाहत होते. आपल्या भाषणामध्येही शिवराज सिंह चौहान यांनी, राजकोटचा रस्ता खराब आहे, पुढच्या वेळी मी आरामात येईन, असे विधान करत आपल्याला घाई असल्याचे सूचित केले. त्यांनी आपले भाषण आटोपते घेतले. त्यानंतर शिवराज सिंह चौहान ताफ्यासह जुनागढहून राजकोटच्या दिशेने घाईघाईत निघाले. दुसरीकडे साधना गिरनारला भेट देऊन परत आल्या होत्या आणि प्रतीक्षागृहात शिवराज सिंह चौहान यांची वाट पाहत बसल्या होत्या. सुमारे १० मिनिटे प्रवास केल्यानंतर साधना त्यांच्यासोबत अथवा ताफ्यातील एकाही कारमध्ये नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग त्यांनी ताबडतोब पत्नीला फोन केला आणि ते ताफ्यासह परतले. पत्नीला घेऊन ते राजकोटला रवाना झाले.



## पृथ्वीवरचा चंद्र

२० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पाऊल ठेवलं. हे चंद्रावर पडलेलं मानवाचं पहिलं पाऊल होतं. आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर अमेरिकेचा झेंडा रोवला. आपलं हे छोटंसं पाऊल अखिल मानवजातीसाठी मोठी उडी ठरेल, असं त्यांनी नमूद केलं होतं. मानवाची चंद्रावरही ही स्वारी ऐतिहासिक ठरली. हे अमेरिकेचं मोठं यश होतं. मात्र या यशात आईसलँडचाही वाटा होता. 'अपोलो ११' या मोहिमेआधी अंतराळवीरांना चंद्रासारखं वातावरण असणाऱ्या पृथ्वीवरच्या एका ठिकाणी पाठवण्यात आलं होतं. हे ठिकाण आईसलँडमध्ये आहे. आईसलँडच्या उत्तर किनाऱ्यावर असणाऱ्या हुसाविक या ठिकाणी अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यात आलं. हुसाविक हे २३०० मच्छिमारांचं छोटंसं शहर होतं. नासाने १९६३ ते १९६७ या काळात ३२ अंतराळवीरांना या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठवलं होतं. आजवर १२ लोकांनी चंद्रावर पाऊल ठेवलं आहे. अंतराळ मोहिमेआधी यापैकी नऊ लोक हुसाविक या ठिकाणी आले होते. यात नील आर्मस्ट्राँगचाही समावेश होता. म्हणूनच हुसाविक या ठिकाणाचं मोठं महत्त्व आहे.

## खाऱ्या पाण्याचं सरोवर



मध्य आशियातल्या देशांमध्ये असणाऱ्या पामीर पठाराला जगाचं छप्पर म्हटलं जातं. हे पठार आणि पर्वतरांगांच्या मध्ये एक सरोवर आहे. हे सरोवर समुद्रसपाटीपासून सुमारे चार हजार मीटर उंचीवर आहे. काराकुल सरोवर असं त्याचं नाव. हे सरोवर दक्षिण अमेरिकेतल्या टिटिकाका सरोवरापेक्षाही अधिक उंचीवर आहे. ते सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं. पृथ्वीवर उल्कापिंड पडल्यामुळे तयार झालेल्या खड्ड्यामुळे या सरोवराची निर्मिती झाली आहे. हे सरोवर ३८० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. ते खूप खोलही आहे. हे स्थान चारही बाजूंनी बर्फाच्छादित पर्वतरांगांनी घेरलं आहे. या सरोवरातल्या पाण्याचा रंग दिवसभरात बरेचदा बदलतो. रात्रीच्या वेळी या सरोवरातल्या पाण्याचा रंग काळाकुट्ट दिसतो. म्हणूनच या सरोवराचं नाव काराकुल असं ठेवण्यात आलं आहे. काराकुल म्हणजे काळा. काराकुल हे आशिया खंडातलं सर्वात खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे. यात फक्त एका प्रजातीचा मासा राहतो. त्याशिवाय दुसरा कोणताही जीव या खाऱ्या पाण्याच्या सरोवरात टिकून राहू शकत नाही.



# बाजाराने दिले जोरदार रिकव्हरीचे संकेत

## सेन्सेक्स 746 अंकांनी वाढला

मुंबई, दि. ११ प्रतिनिधी

भारतीय शेअर बाजारांमध्ये ११ ऑगस्ट रोजी मोठी सुधारणा दिसून आली. सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्हीही सुमारे १% वाढीसह बंद झाले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग, रिअल्टी आणि ऑटो क्षेत्रातील जोरदार खरेदीमुळे शेअर बाजारात तेजी आली. गेल्या ५ वर्षातील सेन्सेक्स आणि निफ्टीमधील सर्वात मोठ्या आठवड्यातील घसरणीनंतर ही वाढ झाली आहे. परदेशी गुंतवणूकदारांच्या आणि खालच्या पातळीवर खरेदीमुळे या वाढीला पाठिंबा मिळाला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ७४६.२९ अंकांनी वधारून



८०,६०४.०८ वर बंद. तर निफ्टी २२१.७५ अंकांनी वाढून २४,५८५.०५ वर पोहोचला.

शेअर बाजारात आजची वाढ सर्वांगीण होती. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.७९ टक्के आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.३५ टक्के वाढून बंद झाला. क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये फक्त निफ्टी कंझ्युमर ड्युरेबल्स निर्देशांक घसरून बंद झाला.

या घसरणीचे कारण म्हणजे पीजी इलेक्ट्रोप्लास्ट, अंबर एंटरप्रायझेस आणि व्होल्टास यांचे जून तिमाहीतील कमकुवत निकाल. दुसरीकडे, सर्वाधिक वाढ पीएसयू बँक, रिअल्टी आणि ऑटो स्टॉक्समध्ये दिसून आली.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज ११ ऑगस्ट रोजी ४४४.०२

**सेन्सेक्स 80,604**

**निफ्टी 24,585**

लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे त्याच्या मागील ट्रेडिंग दिवशी म्हणजेच शुक्रवार, ८ ऑगस्ट रोजी ४४०.६३ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज ३.३९ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी २७ शेअर्स आज वाढीसह बंद झाले. यामध्ये टाटा मोटर्सच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.२४ टक्के वाढ दिसून आली. त्यानंतर, इटरनल, ट्रेंट, स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) आणि अल्ट्राटेक सिमेंटचे शेअर्स २.४९ टक्के ते २.८४ टक्के वाढीसह बंद झाले.

आज सेन्सेक्समधील फक्त ३ शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्स (BEL) चा शेअर सर्वाधिक ०.२० टक्क्यांनी घसरला. याशिवाय भारती एअरटेल आणि मारुती सुझुकीचे शेअर्स अनुक्रमे ०.०९ आणि ०.०२ टक्क्यांनी घसरले.

# देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊनमधील विशाल राईसमिलचा गडचिरोली येथे निकृष्ट तांदूळ

## शासकीय गोदामात गोदाम व्यवस्थापकाचा तांदूळ स्वीकृत करण्यास नकार

देसाईगंज, दि. ११ प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन स्वीकृत करण्यात आलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली जिल्ह्यातील तब्बल तीन शासकीय गोडाऊन मध्ये स्वीकृत न करता परत करण्यात आल्याची घटना ताजी असतांनाच गडचिरोलीच्या शासकीय गोदामातही देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिलचा निकृष्ट तांदूळ आढळून आला आहे.यामुळे एकुणच आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा वारंवार पुरवठा केल्या जात असल्याचे गडचिरोली येथील गोदाम व्यवस्थापकाने आढळून आलेला तांदुळ स्वीकृत करण्यास नकार दिल्याने आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये निकृष्ट तांदूळ स्वीकृत करून कर्तव्यात कसूर करणाऱ्या गुणनियंत्रण अधिकारी व त्याचेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेले निरिक्षण अधिकारी हे दोषी असल्याने त्यांना तात्काळ निलंबित करून निकृष्ट तांदळाचा पुरवठा करणाऱ्या मिलरवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली असल्याने संबंधित विभागात एकच खळबळ माजली आहे.

प्राप्त माहितीनुसार देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांचा मानवी खाण्यास अयोग्य सिएमआर तांदुळ येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांनी संगनमताने कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता गडचिरोली येथील शासकीय गोदामात दि.३१ जुलै २०२५



रोजी सार्वजनिक वितरणाकरीता गडचिरोली येथील अनुराग ट्रान्सपोर्ट कंपनीच्या एमएच-34 एम- 6133 या क्रमांकाच्या वाहनाने तब्बल 450 कट्टे सिएमआर तांदुळ आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज(वडसा) येथुन गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठवला होता.सदर तांदुळ विशाल राईसमिल कुरुडचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांच्या मिलमध्ये भरडाई करून आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज येथे गुणवत्ता तपासणी करीता पाठविण्यात आल्याचे भासविण्यात आले. वास्तवात सदर तांदळाची कोणतीच गुणवत्ता तपासणी न करता मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ पाठविण्यात आल्याचे गडचिरोलीच्या शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापक नरेन्द्र खोब्रागडे याने सदर तांदुळ मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे सबब पुढे करून सदर तांदूळच गोदामात उतरवून स्वीकृत करण्यास नकार देत आकाश अग्रवाल गोडाऊन व विशाल राईसमिल यांना तब्बल 450 कट्टे तांदुळ बदलून देण्यासंदर्भात पत्र दिले.

वास्तवात देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिल कुरुडचा तांदुळ येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांनी सदर तांदळाची गुणवत्ता तपासणी करूनच गडचिरोली येथील शासकीय गोदामात सार्वजनिक वितरणाकरीता पाठवणे आवश्यक होते.मात्र येथील जबाबदार अधिकाऱ्यांनी सदर तांदळाची कोणतीच गुणवत्ता तपासणी न करता गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठवल्याचे यामुळे स्पष्ट होते. असे असल्याने गडचिरोली येथील शासकीय गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे याने सदर तांदुळ जप्त करून व तसा वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर करून सदर तांदळाचा पंचनामा करणे अपेक्षित होते.तसेच मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करणाऱ्या विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांचेवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत व पुरवठा करण्यात आलेल्या तांदळाची कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता तांदुळ स्वीकृत करणाऱ्या आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस्तव आवश्यक कारवाई करणे अपेक्षित होते.

दरम्यान गडचिरोली येथील शासकीय गोदामात कर्तव्यावर असलेल्या गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे यांनीही असे न करता पाठवलेल्या तांदळाचे वाहान खाली करून नियमानुसार स्वीकृत केलेला तांदूळ बदलून न मागता कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असतांना कर्तव्यात कसूर करून संबंधितांना लाभ पोहचवण्याचा प्रयत्न केला असल्याचे यावरून दिसून येते.एकुणच घडामोडींवरून संगनमताने मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करून आर्थिक लाभ पोहचवणे हा उद्देश असल्याचे स्पष्ट होत असल्याने या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून या प्रकरणात दोषी असलेल्या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करून सार्वजनिक वितरण प्रणालिच्या माध्यमातून भाग पाडणारांवर सक्त कारवाई करण्याची वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही गडचिरोली येथील शासकीय गोदामात परत तिसऱ्यांदा आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज येथे निकृष्ट तांदुळ स्वीकृत करून पाठविण्यात आला असल्याने या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागून असुन कारवाई करण्यात न आल्यास येथील सामाजिक कार्यकर्ते आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याने करण्यात येत असलेल्या कारवाईकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# दिल्लीमधील सर्व भटक्या कुत्र्यांना आठ आठवड्यांत पकडा - सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-एनसीआर भागातील भटक्या कुत्र्यांबद्दल मोठा निर्णय दिला आहे. या भागातील सर्व भटक्या कुत्र्यांना ८ आठवड्यांच्या आत पकडा आणि संबंधित अधिकाऱ्यांनी उभारलेल्या निवारा केंद्रांमध्ये ठेवा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला दिले आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये दिल्ली आणि परिसरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या महत्त्वपूर्ण आदेशात नगरपालिका आणि इतर यंत्रणांना निर्धारित वेळेत पुरेशी निवाऱ्याची व्यवस्था उभारण्यासाठी समन्वयाने काम करावे आणि सार्वजनिक ठिकाणांहून भटकी कुत्री हटवली जातील याची खात्री करा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.



एकदा शेल्टरमध्ये हलवल्यानंतर कोणत्याही भटक्या कुत्र्याला पुन्हा रस्त्यावर सोडले जाऊ नये असेही न्यायालयाने म्हटले आहे. भटक्या कुत्र्यांना शेल्टरमध्येच ठेवले जावे आणि त्यांना रस्ते, कॉलन्या किंवा सार्वजनिक ठिकाणी सोडू नये असेही सर्वोच्च न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. यावेळी दिल्ली सरकार, एमसीडी आणि एनडीएमसीला सर्व परिसरातील भटक्या कुत्र्यांना पकडण्यास सुरुवात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

इतकेच नाही तर जर कोणी व्यक्ती किंवा संस्था या भटक्या कुत्र्यांना पकडण्याच्या मधे येथ असेल तर अशांविरोधात कारवाई केली जाणार आहे. लहान किंवा तरुण मुले हे कोणत्याही परिस्थितीत भटक्या कुत्र्यांचे शिकार होता कामा नयेत, यावर देखील न्यायालयाने यावेळी भर दिला.

गेल्या महिन्यात कुत्र्यांनी चावा घेतल्याने रेबिज झाल्याच्या घटनांसंबधी माध्यमांमध्ये छापून आलेल्या बातम्यांची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली होती. शहर आणि शहरालगतच्या भागांमध्ये दररोज शेकडो लोकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना समोर येत आहेत, ज्यामुळे लहान मुले आणि वयस्क हे रेबिज या भीषण आजाराला बळी बडत आहेत, असे न्यायालयाने म्हटले होते.

दरम्यान राजधानी दिल्लीतील भटक्या कुत्र्यांची समस्या सोडवण्यासाठी दिल्ली महानगरपालिकेने (MSD) लवकरच ते ॲनिमल बर्थ कंट्रोल सेंटर्समध्ये सुधारणा करतील आणि झोन निहाय अँटी-रेबिज जागरुकता मोहिम राबवतील असे या महिन्याच्या सुरूवातीलाच जाहीर केले होते.

# डेंगू आजार काळजी आणि उपचार

**निसर्गनियमाप्रमाणे पावसाळा,हिवाळा आणि उन्हाळा असं ऋतुचक्र अव्याहतपणे सुरु असत. परंतु, जेंव्हा एक ऋतू संपून दुसरा ऋतू सुरु होत असतो तेंव्हा जे बदल वातावरणात घडतात ते सहज स्वीकारणं शरीरासाठी अवघड असत आणि त्यामुळेच अशा वातावरणाशी जुळवून घेण्यास शरीर अनुकूल नसल्यामुळेच आपल्याला आजारांना सामोरं जावं लागत. विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात दूषित पाणी साचत आणि जलजन्य किंवा कीटकजन्य स्वरूपाचे आजार पसरतात. यापैकीच एक आजार म्हणजे डेंग्यू. अशा आजारांपासून बचाव करण्यासाठी काळजी नेमकी कशी घ्यायची?यावर प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपाय कोणते आहेत?याच संधर्भात बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक आणि डेंगू विकार तज्ज्ञ डॉ. नागनाथ रेडेवार यांच्याशी साधलेला संवाद.**

१] पावसाळ्यात कीटकजन्य आजार देखील उद्भवतात ते नेमके कोणते ?

पावसाळ्यात दूषित पाणी मोठ्या प्रमाणात साचत आणि त्यातूनच अनेक प्रकारचे कीटकजन्य आजार उद्भवतात. अनेक प्रकारचे जे डास आहेत त्यामुळे मलेरिया,डेंगू,चिकनगुनिया आणि मेंदूज्वर असे आजार होतात. मलेरियाचे शरीभागातील प्रमाण हे मागील ३ ते ४ वर्षांपासून खूपच कमी झालेले आहे मात्र विदर्भ आणि मराठवाडा भागात मात्र १०० पैकी ७० टक्के मलेरिया चे रुग्ण आढळता . डेंगू आणि मलेरिया हे आजार एडिस इजिप्त या जातीच्या मच्छरांमुळे होतात. या आजाराचा वाहक एकाच असल्यामुळे हे दोन्ही आजार होतात.

२]डेंगू आणि मलेरिया या आजारामधील फरक नेमका कसा ओळखायचा ?

गम्मत अशी कि डेंगू आणि मलेरिया दोन्ही आजारात ताप हा येतो. डोकेदुखी,अंगदुखी अशी काही लक्षण सारखीच असतात. पण डेंगू मध्ये डोळे खूप दुखतात. मलेरिया किंवा डेंग्यूचा रुग्ण ओळखणं खूप कठीण असत. दोन तीन दिवसात लक्षण तपासून डॉक्टरांच्या निरीक्षणाखालीच हे आजारा नेमके काय आहते हे ओळखुन त्यावर योग्य ते उपचार करता येतात.

३]आपल्याला जो डास चावलेला आहे तो साधा डास आहे कि डेंग्यूचा हे कसे ओळखायचे?

१६ मे हा राष्ट्रीय डेंगू दिवस म्हणून पाळला जातो आणि त्याच अनुषंगाने आपण प्रशिक्षणाचा कार्यक्रम देखील

**हॅलो डॉक्टर**

राबवतो. शिवाय जुलै महिना डेंगू प्रतिरोध महिना म्हणूनदेखील पाळला जातो. डेंग्यूची अळी ओळखायची कशी?तर आपल्या घरात साचलेल्या पाण्याच्या टाकीत ज्या अळ्या असतात त्या अळयांच्या शरीरावर वाघाच्या शरीराप्रमाणे सफेद पट्टे असतात त्या अळ्या म्हणजे डेंग्यूच्या अळ्या असतात.

४]डेंग्यूची आणि व्हायरल इन्फेक्शनची लक्षण कशी ओळखायची?

डेंगू,फ्लू मध्ये ताप हा सारखाच असतो. डोकं दुखते,अंगावर पुरळ येतात आणि अंग देखील दुखते. व्हायरल आजारामध्ये सर्दी,खोकला देखील असतो. परंतु डेंग्यूच्या आजाराचं निदान लवकर होत नाही. डेंग्यूची प्राथमिक लक्षण म्हणजे ताप येणं,डोकं दुखंन,डोळे दुखतात,अंगावर पुरळ येतात हि लक्षण

**लोकारोग्य**



तीन चार दिवस दिसतात . आठ ते दहा दिवसानंतर मात्र हि लक्षण गंभीर दिसतात कधीकधी हिरड्यांमधून किंवा शरीरांतर्गत रक्तस्त्राव होतो,लघवीतून रक्त जाते,अशा वेळी घरच्या घरी उपचार करण्यापेक्षा अशा रुग्णाला लगेच रुग्णालयात ॲडमिट करणंच उत्तम. पॅरासिटॅमाल किंवा अस्पिरीन अशा गोळ्या घेतल्या तर शरीरांतर्गत रक्तस्त्राव वाढू शकतो. डेंग्यूच्या आजाराची अत्यंत गंभीर स्टेज म्हणजे पोटात काही न राहणे,मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होणे,लघवी कमी होणे अशी गंभीर लक्षांह दिसतात.

५ ]डेंग्यूमध्ये शरीरातील, प्लेटलेट्स कमी होतात म्हणजे नेमकं काय होत? डेंगूवर उपचार नेमके कोणते आहेत?

मानवी शरीरात ३ प्रकारच्या पेशी असतात. लाला पेशी,पांढऱ्या पेशी आणि प्लेटलेट्स अर्थात रक्तपिण्डिका. या प्लेटलेट्स अर्थात रक्तपिंडिकांचा काम असत रक्त गोठविण्याचं. आपल्याला पडल्यानंतर,किंवा लागल्यानंतर याच रक्त पिंडिकांचं कार्य महत्वाचं असत. व्हायरल इन्फेक्शन जेंव्हा होत तेंव्हा या प्लेटलेट्स बनण्याचा जो स्रोत असतो त्यावर परिणाम झाल्यामुळे प्लेटलेट्स कमी होतात त्यामुळेच डेंगू मध्ये शरीरातील या प्लेटलेट्स वाढविण्यासाठी प्रयत्न होतात. आपल्याकडे मलेरिया किंवा फ्लूवर अगदी लेप्टोस्पायरोसिस वर देखील उपचार आहेत मात्र डेंगू वर उपचार नाहीत. म्हणूनच ताप आला कि तो कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. शरीरात डिहायड्रेशन मोठ्या प्रमाणात होत ज्यामुळे पाण्याच प्रमाण कमी होत ते बहरून काढण्यासाठी भरपूर पाणी किंवा लिंबू पाणी पिन आणि सर्वात महत्वाचं म्हणजे भरपूर आराम करणं हेच प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपचार आहेत. मात्र डेंग्यूवर ठोस स्वरूपाचे उपचार नाहीत.

## डिजिटल दंतचिकित्सा क्षेत्रात एआय क्षमतांचा विस्तार

दंत उत्पादने देणारी कंपनी लक्ष्मी डेंटल लिमिटेडने घोषणा केली की त्यांच्या संचालक मंडळाने दंतचिकित्सा क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता अनुप्रयोगांवर लक्ष केंद्रित करणारी गुजरातस्थित आरोग्यसेवा तंत्रज्ञान कंपनी आयडीबीजी एआय डेंट ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणूक करण्यास मान्यता दिली आहे. पूर्ण झाल्यानंतर, लक्ष्मी डेंटल लिमिटेड एआय डेंटमध्ये ५८% भांडवल धारण करेल. या संपादनाचे उद्दिष्ट कंपनीचे संशोधन आणि विकास मजबूत करणे आणि तिच्या तंत्रज्ञान ऑफरचा विस्तार करणे आहे. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत देशांतर्गत उत्पादन आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्यासाठी भारताच्या प्रयत्नांना देखील हे पाऊल समर्थन देते.



**जनआरोग्य**

एआय जगभरात दंतचिकित्सा क्षेत्रात एक मूलभूत तंत्रज्ञान बनत आहे. निदानापासून ते उपचार नियोजनापर्यंत, एआय टूल्स निर्णय घेण्याचे आणि क्लिनिकल निकालांमध्ये सुधारणा करत आहेत. या गुंतवणुकीद्वारे, लक्ष्मी डेंटलचे उद्दिष्ट दंत काळजीसाठी एआयमध्ये स्थानिक क्षमता निर्माण करणे आहे, ज्यामुळे दंतवैद्यांना रुग्णांसाठी प्रक्रियात्मक गुंतागुंत कमी करताना जलद, डेटा-चालित प्रक्रिया स्वीकारण्यास सक्षम केले जाईल. दंतवैद्यांना सातत्यपूर्ण काळजी देण्यात मदत करणारी आणि रुग्णांना निदान आणि उपचारांमध्ये सुधारित प्रवेश, अचूकता आणि स्पष्टता प्रदान करणारी प्रणाली तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

लक्ष्मी डेंटल लिमिटेडचे अध्यक्ष आणि पूर्ण-वेळ संचालक राजेश खाखर म्हणाले, ''एआय हा दंतचिकित्सा क्षेत्रातील उत्क्रांतीचा पुढचा टप्पा आहे. जगभरातील क्लिनिकमध्ये काळजी कशी दिली जाते हे ते आकार देत आहे. एआय डेंटमधील आमची गुंतवणूक भारतीय दंतवैद्य आणि रुग्णांच्या जवळ आणण्यासाठी डिझाइन केलेली आहे. दंतवैद्यांना त्यांच्या कामात मदत करणारी आणि रुग्णांसाठी दंत भेटी सोप्या आणि अधिक समजण्यायोग्य बनवणारी साधने तयार करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे. हे केवळ डिजिटल अवलंबनाबद्दल नाही तर भविष्यासाठी दंतवैद्यांना तयार करण्याबद्दल आणि काळजी घेणाऱ्या प्रत्येक रुग्णासाठी अनुभव सुधारण्याबद्दल आहे.''

आरोग्यम् धनसंपदा

## औषधी चिवळ भाजी

मान्सूनचे आगमन झाल्यानंतर आणि पाऊस पडल्यानंतर सर्वत्र हिरवळ पसरते. तसंच या हिरवळीबरोबर माळरानावर, पाणथळ भाग आणि शेतात गवत म्हणून चिवळ ही रानभाजी येते. चिवळ ही भाजी सगळ्यांना माहित असेल पण तिला प्रत्येक भागानुसार वेगवेगळी नावे आहेत. जसं की कोण रानघोळ, भुईचौली, खाटेचौनाळ, चिवळी, लहान घोळ आणि छोटी घोळ अशा नावाने त्या भाजीची ओळख आहे.कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश या भागात चिघळ येते. तसंच संपूर्ण भारतात ही उगवते. ही वर्षायू वनस्पती जमिनीवर पसरत वाढते. ही वनस्पती अगदी नाजूक असून खोडांचा, पानांचा आणि फांद्यांचा आकार अतिशय लहान असतो. चिवळ या वनस्पतीच्या बिया मूत्रपिंड आणि बस्ती यांच्या रोगात वापरतात. चिवळीच्या बियांच्या फांटामुळे लघवीचे प्रमाण वाढते त्यामुळे आजार बळावत नाहीत. जेवणात चिवळ भाजीचा समावेश असेल तर रक्तशुद्धी करण्यास मदत करते. ही भाजी शरीरातील उष्णता कमी करणारी आणि लघवी साफ होण्यासाठी उपयुक्त आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

## अशा धमक्यांपुढे आम्ही झुकणार नाही

### मुनीरच्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या पोकळ धमकीवर परराष्ट्र मंत्रालयाचे खडे बोल

नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था

प्रत्येक युद्धात भारताकडून पराभूत होणारा पाकिस्तान आपल्या सवयी सोडायला तयार नाही. पुन्हा एकदा पाकिस्तानने अणुबॉम्ब हल्ल्याची पोकळ धमकी दिली आहे. तथापि, भारताने स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, "आम्ही अशा कोणत्याही धमक्यांना घाबरणार नाही."

वास्तविक, पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी अमेरिकेतून उघडपणे अणुबॉम्बची धमकी दिली आहे. एका कार्यक्रमादरम्यान त्यांनी म्हटले की, "जर पाकिस्तानला भारतासोबतच्या युद्धात अस्तित्वाचा धोका निर्माण झाला, तर आम्ही अर्धे जग आमच्यासोबत बुडवू." त्यांच्या या बेजबाबदार विधानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या या टिप्पणीवर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने सडेतोड उत्तर दिले. सोमवारी जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, "आमचे लक्ष पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी अमेरिकेच्या दौऱ्यादरम्यान कथितरित्या केलेल्या टिप्पणीकडे वेधले गेले आहे. अणुबॉम्बची धमकी देणे हे पाकिस्तानचे पारंपरिक काम आहे."

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, "आंतरराष्ट्रीय समुदाय अशा टिप्पण्यांमधील बेजबाबदारपणाबद्दल स्वतःचे निष्कर्ष काढू शकतो, जे अशा राज्यात अणु कमांड आणि नियंत्रणाच्या अखंडतेबद्दलच्या सुस्थापित शंकांना आणखी बळकट करते, जिथे लष्कर दहशतवादी गटांशी सामील आहे."

## मराठ्यांना आरक्षण द्यायला पवारांचा विरोध, त्यांना जाब का विचारत नाही?

### विखे पाटलांचा जरांगे यांना प्रश्न

धाराशिव, दि. ११ प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांना दोन प्रश्न विचारले आहेत. देवेंद्र फडणवीसांवर टीका करून मराठा आरक्षण मिळणार आहे का? असं राधाकृष्ण विखे पाटलांनी विचारलं. तसेच मराठा समाजाला आरक्षण देता येत नाही, ही शरद पवारांनी जाहीर भूमिका मांडली. मराठ्यांना आरक्षण द्यायला पवारांचा विरोध आहे. त्यावर मनोज जरांगे पाटील का बोलत नाहीत? असाही प्रश्न विखे पाटील यांनी केला. विखे पाटील धाराशिवमध्ये माध्यमांशी बोलत होते.

एकनाथ शिंदेच नाही तर सरकारमधील सर्वच मराठा नेत्यांना संपवण्याचं काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत असा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी केला आहे. त्यावर राधाकृष्ण विखे पाटलांनी प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीसावर टीका करणे, मराठा आरक्षणाला फडणवीसांचा विरोध आहे असं सांगणे आणि त्याला जातीय रंग देणे हा प्रकार चुकीचा असल्याचं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. फडणीसांच्या काळातच मराठ्यांना आरक्षण मिळालं होतं. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे साहेबांनीच मराठा आरक्षणाबाबत भूमिका घेतली होती. आजही महायुतीची तीच भूमिका आहे असं विखे पाटील म्हणाले.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनीच आपल्याला आरक्षण दिलं आणि ते सुप्रीम कोर्टापर्यंत टिकलं. अडीच वर्षांच्या महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे उद्धव ठाकरे असतील, त्यांचे नेते शरद पवार असतील, त्यांनी आरक्षणासंदर्भात योग्य भूमिका न घेतल्याने आरक्षण घालवलं. स्वतः शरद पवारांनी अनेक वेळा सांगितले की मराठ्यांना आरक्षण देता येत नाही. त्याबद्दल जरांगे पाटील कधीच बोलत नाहीत. फक्त फडणवीस यांच्यावर टीका केली की आरक्षण मिळणार आहे का?"

# एअर इंडियाच्या विमानात बिघाड; के. सी. वेणुगोपाल यांच्यासह शेकडो प्रवासी थोडक्यात वाचले

नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था

एअर इंडियाच्या तिरुवनंतपुरमहून दिल्लीला निघालेल्या विमानात संभाव्य तांत्रिक बिघाड आणि खराब हवामानामुळे मोठी दुर्घटना होता होता टळली. या विमानाला रविवारी चेन्नई विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले. या विमानातून प्रवास करणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के. सी. वेणुगोपाल यांनी हा प्रवास 'भयावह' असल्याचे सांगत, लँडिंगवेळी एकाच धावपट्टीवर दुसरे विमान असल्याचा धक्कादायक आरोप केला आहे.



एअर इंडियाच्या विमान क्रमांक AI2455 ने रविवारी तिरुवनंतपुरम येथून दिल्लीसाठी उड्डाण केले. मात्र, मार्गातील खराब हवामान आणि विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचा संशय आल्याने वैमानिकाने खबरदारीचा उपाय म्हणून विमान चेन्नईकडे वळवण्याचा निर्णय घेतला. विमान चेन्नईत सुरक्षितपणे उतरले असून, आता त्याची आवश्यक तांत्रिक तपासणी केली जाईल, असे एअर इंडियाने स्पष्ट केले आहे.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, "प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीरी व्यक्त करत आहोत. आमचे चेन्नईतील सहकारी प्रवाशांना सर्वतोपरी मदत करत असून, त्यांना लवकरात लवकर त्यांच्या निश्चित स्थळी पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली जात आहे."

या विमानातून प्रवास करणारे काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांनी 'X' वरील एका पोस्टमध्ये आपला थरारक अनुभव सांगितला आहे. त्यांनी म्हटले आहे की, "माझ्यासोबत अनेक खासदार आणि शेकडो प्रवाशांना घेऊन जाणारे एअर इंडियाचे विमान AI2455 आज मोठ्या दुर्घटनेच्या अगदी जवळ पोहोचले होते. उशिराने सुरू झालेला हा प्रवास पुढे भयावह ठरला. टेक-ऑफनंतर लगेचच विमानाला हादरे बसले. सुमारे तासाभराने कॅप्टनने फ्लाईट सिग्नलमध्ये बिघाड झाल्याचे सांगत विमान चेन्नईकडे वळवले. जवळपास दोन तास आम्ही विमानतळावर लँडिंगच्या परवानगीची वाट पाहत घिरट्या घालत होतो. पहिल्या प्रयत्नात लँडिंगवेळी तर काळजाचा ठोकाच चुकला, कारण त्याच धावपट्टीवर दुसरे विमान असल्याचे सांगण्यात आले. त्या क्षणी कॅप्टनने प्रसंगावधान दाखवत विमान पुन्हा वर उचलण्याचा निर्णय घेतला आणि सर्वांचे प्राण वाचले. दुसऱ्या प्रयत्नात विमान सुरक्षितपणे उतरले. आम्ही कौशल्य आणि नशिबामुळे वाचलो."

वेणुगोपाल यांनी पुढे म्हटले की, "प्रवाशांची सुरक्षा नशिबावर अवलंबून राहू शकत नाही. मी नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (DGCA) आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला या घटनेची तातडीने चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची आणि अशा चुका पुन्हा होणार नाहीत याची खात्री करण्याची विनंती करतो." या गंभीर आरोपांनंतरही नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) अद्याप या प्रकरणी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**